म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. १४८८

BVBK-0401488

१४८८
५।५१

# संपादकीय प्रस्ताव

'अरगडे कुलकर्णी प्रकाशन' ही एक ध्येयवादी बाल-साहित्य प्रकाशन संस्था आहे. ज्यांत जीवनविषयक चिरंतन मूल्यांची जपणूक केली गेली असेल अशी सुबोध, सुंदर व मुलांच्या मनाची पकड घेणारी पुस्तके सातत्याने प्रसिद्ध करून बालवाचकांची वाचनविषयक अभिरुची वाढविण्यात या प्रकाशनसंस्थेनें उच्चांक गाठला आहे. आतापर्यंत 'कुमार माला' 'मनोरंजन माला' 'किशोर गंमत जंमत माला' 'कुमार अंगत पंगत माला' 'किशोर आनंदमाला' 'नाट्य रंजन माला' 'सुबोध साहित्य माला' 'संस्कार कथा माला' 'किशोर विनोदन माला' 'कथारूप शिवराज दर्शन' 'आला संतांचा मेळा' 'नाटयरूप शिवशाही' 'विज्ञान छंद माला' 'छत्रपतींचे पंतप्रधान' इत्यादी या प्रकाशनसंस्थेतर्फे प्रसिद्ध झालेल्या माला अत्यंत लोकप्रिय झाल्या आहेत.

या प्रकाशनसंस्थेच्या लोकप्रियतेमध्ये आणखी भर घालण्या-साठी ही 'किशोर अनुरंजन माला' आता किशोरवाचकांच्या भेटीला येत आहे. किशोर अवस्थेमध्ये मुलांचे मन यक्ष, पऱ्या, राक्षस इत्यादी अद्भुताच्या वातावरणातून सर्वस्वी दूर झालेले

नसते. तथापि त्याबरोबरच त्याला जीवनाच्या वास्तवाची ओढही लागलेली असते. अशा मानसिक अवस्थेतील 'मुलांच्या हाती' त्यांचे मन निकोप होऊन त्यावर सुसंस्कार होतील असे साहित्य पडले पाहिजे. वेगवेगळ्या परिस्थितीत मुलामुलींच्या जीवनावर आधारलेल्या या मालेतील कादंबरिकांतून हा हेतू प्रामुख्याने विचारात घेतला आहे. ह्या किशोर अनुरंजन मालेतील सर्व पुस्तके बाल गोपाळ मंडळीना खूप आवडतील असा मला विश्वास वाटतो.

'झोपडपट्टीतला झिपऱ्या' या कादंबरिकेमध्ये सौ. कमलाबाई टिळकांनी झिपऱ्या नावाच्या मुलाची जीवनकथा रंगवली आहे. झोपडीपट्टीतल्या 'दादाच्या' तावडीत सापडलेल्या झिपऱ्याला खिसेकापू म्हणून काम करणे भाग पडते. त्याला आंधळा करण्याचा प्रयत्न होतो. पण राजू परांजपे नावाच्या मित्राच्या साहाय्याने तो स्वतःचे शिक्षण पूर्ण करून झोपडपट्टींचीही सुधारणा करतो, हे कमलाबाईंनी त्यांच्या वैशिष्टयपूर्ण रीतीने निवेदन केले आहे. छोटया वाचकांना झिपऱ्याशी परिचय करून घ्यायला खूपच आवडेल.

सौ. चारुशीला गुप्ते

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. १४८८ दिनांक २०।८।८३
विषय ........ क्र. ..........
BVBK-0401488

# झोपडपट्टीतला

शहराच्या पूर्व भागात वसतीपासून जरा दूर अशी एक पाच मजली इमारत उठत होती. सगळ्या गाळ्यांचे पैसे आगाऊच भावी मालकांनी भरले होते. त्यांची, इमारत लवकर तयार करण्यासाठी कंत्राटदाराकडे घाई चालली होती. त्यामुळे पुष्कळ मजूर लावून, गॅसच्या बत्त्या जाळून रात्रंदिवस झपाट्याने काम चालले होते.

इमारतीबाजूच्या मोकळ्या जागेत मजुरांच्या कामचलाऊ झोपड्या होत्या. त्यांच्यांत त्यांचे संसार गजबजले होते. बायका इमारतीच्या बांधकामाला हातभार लावीत होत्या. पोरे वाळु-सिमेंटमध्ये उधळत होती, पाण्याच्या हौदात डुंबत होती.

इमारत तयार झाली, सगळ्या ब्लॉक्स्‌मधून फर्निचरची आरास मांडली गेली, दिवे झगमगू लागले. रेडिओची, टी. व्ही. ची शिंगे गुढ्यांसारखी वैभवाची साक्ष देऊ लागली. कधी मधुर संगीत, तर कधी जाहिरातबाजीच्या भसाड्या किंवा कर्कश घोषणा खोल्याखोल्यांतून दुमदुमू लागल्या.

इमारती समोरच्या झोपड्याही जास्त भक्कम, टिकाऊ होऊ लागल्या. बाप्ये इतर इमारतींच्या बांधकामाचे किंवा गिरण्या हॉटेलांचे काम शोधीत वणवण हिंडू लागले. बाया आपल्या समोरच्या इमारतीत कुठे धुणे-भांडी, तर कुठे मुलांना शाळेत पोचवण्याचे, अशी तऱ्हेतऱ्हेची कामे मिळवू लागल्या.

मुलांचा मात्र मनसोक्त हुंदडण्याचा कार्यक्रम पूर्वीप्रमाणे किंवा जास्तच जोरात सुरू झाला. कारण आता मनाई करायला, शिव्या घालायला किंवा दणके द्यायला आई-बाप दिवसभर झोपडीत नसतच.

इमारतीचे नाव 'रामाश्रम.' झोपडपट्टीचे नाव 'जवाहरनगर.'

रामाश्रमाच्या तिसऱ्या मजल्यावर परांजप्यांचा ब्लॉक. झोपडपट्टी खिडकीतून समोरच दिसायची. परांजप्यांचा पाच वर्षांचा राजू या खिडकीत बसून झोपडपट्टीकडे घटकान् घटका बघत राहायचा. मग त्याला शाळेत घेऊन जाणारी बाई घाईघाईने यायची अन् म्हणायची,

"हं, चला. नाना, टाइम झाला शाळेचा."

राजू अगदी नाखुषीने खिडकीजवळून उठायचा. त्याला वाटायचे, ही झोपडपट्टीतली मुलं किती सुखी! शाळा नाही, कपडे स्वच्छ ठेवायची कटकट नाही! दिवसभर मातीत, पाण्यात दांडगाई करायची, मारामाऱ्या करायच्या, काही मुले तर उन्हे डोक्यावर आली तरी झोपडीसमोर एखाद्या रकट्यावर लोळत पडलेली असायची, "उठा, तोंड धुवा, 'वक्रतुंड' म्हणा" असे कोणीही त्यांना म्हणत नसावे बहुतेक.

बाईचे बोट धरून रेंगाळत राजूची स्वारी शाळेत जायला निघायची. शाळेचा रस्ता झोपडपट्टीवरूनच. बाई आणि राजू झोपडपट्टीवरून जात असताना बहुतेक हाक यायची.

" आये, वो आये ऽ, म्या तुज्यासंगं चलू ? "

राजू आता ती हाक व ती हाक मारणारा झिपऱ्या यांना ओळखू लागला होता. बाई वळून पहाते तों झिपऱ्याची स्वारी, झिपऱ्या खाजवीत आईच्या अंगाला झोंबायला यायचीच. मग बाई त्याला दूर ढकलीत त्याच्यावर खेकसे,


"हट्, दोडा, चिखलाचं हात लागतील न्हवं नानांच्या ब्यागेला."

" मी येतो तुज्यासंगं. " झिपऱ्या हट्ट करायचा.

" पयलं चिपडं काढ डोळ्यांची अन् नाक पूस. चालला भट-काया–फुट–न्हायतर वाजिवते कानसिलावर– "

झिपऱ्या हिरमुसला होऊन परत फिरायचा.

पण मग, फारच हट्ट धरलान् तर झिपऱ्याची आई, राजूच्या घरी धुणंभांडी करायला येई तेव्हा झिपऱ्याला बरोबर आणी. मात्र त्याला ती 'चुपचाप दाराबाहेर बसून राहा' म्हणून बजावी. त्याचं ध्यान घरात आलेलं बाईसाहेबांना आवडणार नाही अशी धास्ती तिला वाटे; पण राजूला झिपऱ्या आल्याची चाहूल लागे. मग ममी झोपली किंवा काही काम काढून बसली की, ती संधी साधून राजू दार उघडी व झिपऱ्याकडे पहात बसे. दोघांनाही पहिल्यापहिल्यांदा एकमेकांशी कसं बोलावं, काय बोलावं, हे समजत नसे; पण मग एखाददुसरा शब्द ते बोलू लागले. एक दिवस कपाळाला भली मोठी मळकट पट्टी बांधून झिपऱ्या आला. पट्टीला बाहेरून रक्ताचे डाग दिसत होते. राजूने विचारले,



"पडलास कुठे ?"

झिपऱ्या जोराने मान हालवीत म्हणाला,

"नाय वा –"

"मग पट्टी कशाला बांधलीस !"

"ही व्हय !" कपाळावर अलगद हात टेकून झिपऱ्या म्हणाला –

"बापसानं लई हाणलं–लई मार पडला–मंग मायनं हलदचुना आत भरूनशान् बांधून ठिवलं."

राजू भयचकित झाला. बापुस म्हणजे डॅडी हे त्याला एकदा ममीने सांगितले होते.

झिपऱ्याच्या बापाने त्याला इतके मारले ?

राजूचे डॅडी त्याला कधीच मारीत नसत. आता ममी एखादी चापट मारी–द्वाडपणा केला तर–आणि अभ्यास नाही केला तर कोपऱ्यात उभा करी, चॉकलेट देत नसे—पण पट्टी बांधावी लागावी एवढं मारणं म्हणजे––

"का मारलं?" राजूने विचारले. "तू अभ्यास नाही केलास?"

"अभ्यास म्हंजे काय असतो ? " झिपऱ्याने कुतूहलाने विचारले.

खरंच, झिपऱ्या कुठं शाळेत जात होता ? त्याची आई त्याला नुसतं शाळेपर्यंत सुद्धा नेत नसे, नाही का ! का, – ते पुन्हा केव्हातरी झिपऱ्याला विचारणार होता राजू, पण आज आधी मारण्याचा उलगडा व्हायला हवा होता.

झिपऱ्या सांगत होता.

"बापूस दारू खाऊन घरला आला–मायला शिव्या घालू लागला, लाथा हाणू लागला. मी झ्वापेतून जागा झालो अन् रडत रडत मायला मिठी घातली तर, मला बाजूला ओढून काढलं बापसानं अन् कोपऱ्यातलं दांडकं घेऊन कपाळावर हाणलं. "

त्यावेळेला झिपऱ्याने आक्रंदून झोपडी डोक्यावर घेतली असेल व तोंड मिटण्यासाठी बापाचा आणखी थोडा मार खाल्ला असेल; पण आता मात्र तो जणू विशेष काही घडलंच नाही अशा सुरात भराभरा बोलत होता.

पण राजू मात्र ते ऐकता ऐकता अगदी हबकून गेला होता. हे जग त्याला अगदीच नवीन होतें. दारू खाणे, बाबांनी आईला लाथा घालणे, शिव्या देणे—छे ! छे !

राजू अगदी कावराबावरा झाला.

आता तो खिडकीतून झोपडपट्टीत बघे तेव्हा 'ही मनसोक्त हुंदडणारी मुले किती सुखी, त्यांना शाळा नाही, काही नाही' हा नेहमीचा विचार त्याला अगदीच चुकीचा वाटू लागला. कपाळाला रक्त येईपर्यंत मार खाण्यापेक्षा रोज शाळेत जाणे, अभ्यासाला बसणे, वेळचेवेळी निजून उठणे, आंघोळ करणें, किती तरी पटीने जास्त चांगले, अशी त्याची खात्री झाली.

आणि मग रात्री जेव्हा झोपडपट्टीतला गलका ऐकून तो जागा होई, तेव्हा ममीने जरा थोपटले की, तो पूर्वीसारखा झोपी जाईनासा झाला. 'डोळे मीट' म्हणून ममीने सांगितले की तो डोळे मिटी; पण त्याच्या डोळ्यापुढे बापाचा मार खात असलेला झिपऱ्या दिसे. झिपऱ्याची माय किंकाळ्या फोडतांना त्याला ऐकू येई. तो अंथरुणात चाळवाचाळव करीत राही आणि शेवटी न राहवून ममीला विचारी –

"झिपऱ्याचा बाप का मारतो झिपऱ्याच्या आईला ? दारू खातो म्हणून ?"

त्याचा तो प्रश्न ऐकून लीलाताई दचकल्या. या गोष्टी या पोराच्या कानावर कशा गेल्या असाव्यात ? त्या लहान मुलांच्या समोर अशा गोष्टी कधी बोलत नसत; पण बालमानसशास्त्राच्या नियमांना अनुसरून राजूच्या प्रश्नाला उत्तर देणें भाग होते. मुलांच्या प्रश्नांना त्यांना समजतील अशी उत्तरे द्यावी, त्यांची

कुतूहल बुद्धी दाबून टाकू नये, हे त्यांना माहीत होते. म्हणून त्या म्हणाल्या,

"अरे, ती माणसं किनई अडाणी आहेत. म्हणून अशी वेडया-सारखी वागतात."

'शाळेत नीट अभ्यास करावा म्हणजे शहाणे होतो आपण हे ममी नेहमी राजूला सांगायचीच. तेव्हा झिपऱ्याप्रमाणे झिपऱ्याचा बापही शाळेत गेला नसावा, म्हणून तो असा अडाणी राहिला; पण मग आता झिपऱ्याने तरी शाळेत गेले पाहिजे. का नाही बरे जात तो?

राजूने आपली शंका, पुन्हा झिपऱ्या आला तेव्हा त्याच्यापुढे मांडली.

"झिपऱ्या, मी जातो तसा तू का नाही शाळेत जात?"

झिपऱ्या आपल्या झिपऱ्या फिस्कारीत, नेहमीसारखा फाडफाड बोलू लागला—

"एक वया कंदी कंदी घरला येती अन् लई काय बाय सांगून जाती – ती एक ठाव मायला म्हनली व्हती, "पोराला घरी बसून ठिऊ नगं; साळंत घाल."—माय व्हय, व्हय म्हनली; पण मग म्या पुसलं तशी म्हनते कशी—"त्या बयाला सांगाया काय व्हतं नुसतं? सांगाया काय पैसे पडत न्हाईत–पन साळा म्हंजे पैका लागतोया–शाफ कापडं पायजित–अशा चिंध्या पांगरून जानार व्हय तू? बुकं लागत्यात, पाटी पेनसल–ह्यो अन् त्यो–खुटून आनायचं पैशे! हतं दो वक्ता प्वाटाची खळगी भराया मारामार व्हतीया–"

पैसे ? हां राजूने पाहिले होते– एक तारखेला डॅडी ऑफिस-मधून आले की लठ्ठ लठ्ठ पाकीट ममीला द्यायचे. मग फीला, वह्या–पुस्तकांना ममी त्यातून पैसे द्यायची.

'तुझे बाबा, माझ्या डॅडींसारखे हपीसातून पैसे नाही आणीत ?'

पण झिपऱ्याला हपीस कुठे असते, तिथे पैसे कोण व का देते, याबद्दल काहीच माहिती नव्हती,

हां, आता बापूस पैसे आणतो, कुठं बिल्डिंगच्या कामावर गेला म्हणजे,–एवढे त्याला ठाऊक होते. ही बिल्डिंग बांधीत होते तेव्हा झिपऱ्याची आई सांगे, "मस्त पैका घरामंदी टाईमसर येत व्हता"–पण अलीकडे काम कुठं नीट भेटत नव्हतं.

"अन् बापसानं पैका आणला तरी समदा देत नाय् मायला" झिपऱ्या सांगत होता. "माय रडती, आरडती तवा वाईच घेतो–तो दानं आनायबी पुरत न्हाय–"

"पण माझी ममी तुझ्या मायला पगार देते की."

राजूने झिपऱ्याच्या आईला त्याची ममी पैसे देताना पाहिले होते.

"पण बापुस मायचे पैशे हिसकावून घेतो, माय लपवूनश्यान ठयेवत्ये–पण मंग त्यो गाडगीमडकी धुंडाळतो अन् न्हाई पैसं गावलं तर बडवतो मायला."

राजूला हे सगळे ऐकून झिपऱ्याची फार दया येई. आपण त्याच्यासाठी काही तरी करावे असे त्याला वाटे; पण काय करावे, हे त्याला सुचत नसे. मग कधी तो ममीने दिलेल्या, व आपल्या छोटया कपाटात जपून ठेवलेल्या टॉफ्यांपैकी एक झिपऱ्याला आणून देई. तो रंगीत चौकोन पाहून झिपऱ्याचे डोळे

लकाकत; किती वेळ तरी तो त्याच्याकडे पहात राही, त्याला कुरवाळीत बसे. मग राजू आपल्या हातातील टॉफी सोलीत झिपऱ्याला म्हणे, " खा ना. "

मग झिपऱ्या अगदी जपून रंगीत कागद काढी व तो साफ करून, नीट घडी घालून आपल्या फाटक्या खिशात ठेवी. राजू पण त्याला आपला कागद देई. टॉफीची गोड चव जिभेवर विरघळत असताना झिपऱ्याचा चेहेरा नुसता फुलून उठे.

कधी कधी राजू आपले बालभारतीचे पुस्तक झिपऱ्याला दाखवी. आपले हात मळक्या चड्डीवर घासून, झिपऱ्या ते पुस्तक हळुवारपणे धरी; पण त्याची पाने उलटायचा त्याला धीर होत नसे. मग राजू एकेक पान उलटून त्याला गाय, घोडा, झाड, ओढा यांची रंगीत चित्रे दाखवी. झिपऱ्या अगदी हरखून जाई. मग राजू सांगे,

" ही बघ, ओढ्यात बदकं पोहताहेत. हा मुलगा बेडकांना दगड मारतोय्. "

" माझ्यावाणी ? " झिपऱ्या खूष होऊन मान डोलावी.

" –पण मग मुलगा दगड टाकीनासा झाला. " राजू रंगात येऊन सांगू लागे.

" ते का म्हून बरं ? दगडं फेकाया तर लई मज्जा येती." झिपऱ्या डोळे विस्फारून म्हणे.

" पण ओढ्यातला बेडूक म्हणाला, " राजू स्पष्टीकरण करी.

" छ्या ! बेडकं कंदी बोलत्यात काय ? "

"हे बघ, इथं लिहिलंय्, बेडूक बोलला म्हणून. शाळेतल्या पुस्तकात खोटं छापतात का कधी ?" राजू डौलाने पुस्तकातल्या ओळींवर बोट ठेवीत म्हणाला.

"ह्ये कालं कालं–मुंग्यांवानी पानभर धावतंया – ह्येच्यांत बेडकं बोलत्यात ?" आश्चर्याने तोंड उघडे टाकीत झिपऱ्या म्हणाला. राजूला हसू आवरेना.

"मुंग्या नाहीत काही या. अरे ही अक्षरं आहेत, अक्षरं–आपण बोलतो ना, तशी."

राजूने 'बे' वर बोट ठेवले. "मी 'बे' म्हणतो ना तोंडाने तो हा 'बे'! बेडूक म्हणाला–" राजू वाचू लागला.

"मुलांनो, तुमचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो."

"आयला–" झिपऱ्याच्या तोंडून चटकन निघून गेले.

"ह्ये समदं या मुंग्यांमधी हाय म्हनतूस ?"

"तर !" राजू फुशारून म्हणाला. "आणखी काय, काय आहे; पण सगळे धडे सरांनी शिकवले नाहीत अजून."

"सर म्हंजे काय असतं ?" झिपऱ्याला शंका आली.

"सर म्हणजे मास्तर रे–आपले मास्तर."

"लई मारत्यात म्हनं." झिपऱ्याने ऐकीव माहिती पुरवली.

"छट्! " राजू शूरपणे म्हणाला–"आपण नीट अभ्यास केला तर मारतील कशाला ?"

"अभ्यास म्हंजे–तू कसा करतोस, दाव ना."

त्यामुळे दूध, भाजी मिळणे शक्यच नव्हते. विजेचा प्रवाहही बंद पडला होता. कुणाची पिठे संपली होती, तर कुणाचा गॅस, अशी सगळ्यांचीच त्रेधा तिरपीट उडाली होती.

राजू खिडकीत बसून समोरच्या देखाव्याकडे पाहत होता. जिथे झोपड्या होत्या, तिथे आता फक्त खळाळणारे पाणी होते. झोपडीभोवती काही गाडगी-मडकी, अलिमनची भांडी तरंगत होती. राजूच्या मनात सारखा विचार चालला होता–' झिपऱ्या कुठे असेल ? जिन्यातल्या लोकांमध्ये असेल तर, केव्हा तरी वर आपल्याकडे येईल, ' अशी आशा त्याला वाटत होती; पण दोन दिवस झाले तरी झिपऱ्याने घंटा वाजवली नाही.

तीन दिवसांनी इमारतीभोवतालचे पाणी ओसरले. इमारतीभोवतालच्या पटांगणात गाळ, घाण साचली होती. पटांगणाची चारी बाजूंची भिंत कोसळली होती.दूधवाल्यांची, भाजीवाल्यांची ये-जा सुरू झाली.

लीलाताईंच्या दूधवाल्याने घंटा दाबली व दुधाच्या बरण्या दृष्टीस पडल्या तेव्हा लीलाताईंना हायसे झाले. तीन-चार दिवस ताक, दही, दूध, –मुख्य म्हणजे चहा न मिळाल्यामुळे त्यांचे डोके अगदी कलकलून गेले होते. पण दूधवाल्याने पुरामुळे झालेल्या हालअपेष्टांचे जे वर्णन केले ते ऐकून तर त्यांच्या जिवाला चटकाच लागला. दूधवाला म्हणाला,

" बाई, गरीब आधीच कफल्लक अन् आता पुरानं सारं घरदार धुवून नेलं– पाहवत नाही पघा त्यांची दुर्दशा. माजा गोठवाडा पलीकडंच हाय् न्हवं; पन उंचावर हाय् म्हूनश्यान् माजी

गुरंढोरं निबावली. काही मानसं पन गमावली झोपडपट्टीतली या पान्यांत–"

"अस्सं?" लीलाताई गलबलून म्हणाल्या. समोरच्या झोपडपट्टीतले काही नेहमी दिसणारे आणि म्हणून ओळखीचे झालेले चेहरे त्यांच्या डोळ्यांसमोर आले.

"व्हय् ना–" दूधवाला पुढे बोलतच होता.

"ती झिपऱ्याची माय हतं कामाला येत व्हती न्हवं?"

"अरे, ती बाळंतपणात गेली. त्याला झाले की तीन-चार महिने."

"हां, तीच. तिचा नवरा बुडाला की वो या पुरात–"

"आं?" लीलाताई दचकून म्हणाल्या.

"व्हय, व्हय. दवंडी ऐकली तशी समदी मानसं धावाधाव कराया लागली. पन ह्ये ध्यान ढेर पिऊनशान झोपडीत मेल्यावानी, निपचिप पडलं व्हतं जनू. दुसऱ्या दिशी त्या कोपऱ्यावरल्या बखळीच्या तारेच्या कुंपनात त्याचं मढं अडकलेलं गावलं–"

"आणि झिपऱ्या–झिपऱ्या कुठाय्?" लीलाताईंनी काळजीच्या स्वरात विचारले.

"त्येचा काईबी पत्ताच न्हाय्– खुटं पोर उधळलं, कुनास ठावं?"

पण लीलाताई व राजू आशेने, समोरच्या झोपडपट्टीकडे वरचेवर पाहत. आता दुसरीकडे आसऱ्याला गेलेली माणसे परतायला लागली होती. तट्टचे, बांबू, प्लॅस्टिकचे तुकडे, सिनेमाचे भितीवरचे

मोठे मोठे पोस्टर, जे जे हाती लागेल, ते ते घेऊन माणसे आपल्या झोपड्या पुन्हा उभ्या करीत होती. गाळात रुतलेली गाडगी-मडकी, अलिमनची टोप-पातेली बाहेर काढून त्याची घूघास चालली होती. झाडामाडांना दोऱ्या बांधून पुन्हा त्यांच्यावर फाटकी रकटी वाळत पडू लागली होती. झोपड्यांच्या छपरांतून ओल्या लाकडांचा धूर पुन्हा बाहेर पडू लागला. दिवसभरचा ओंगळपणा व रात्रीचा धिंगाणा, मारामाऱ्या, शिव्यागाळी पुन्हा पूर्वीप्रमाणे सुरू झाल्या.

पण झिपऱ्याची झोपडी उभी राहिली नाही. त्याची झोपडी बांधायला कुणी राहिलेच नाही. झिपऱ्या राजूला कधी दिसलाच नाही.

दिवसांमागून दिवस चालले होते. राजू आता एकटाच शाळेत जाऊ लागला होता. बाईबरोबर शाळेत जाण्याचे त्याने साफ नाकारले होते. शाळा जवळच तर होती. तो बाईबरोबर दुसऱ्या चिटुकल्या मुलांबरोबर शाळेत निघाला की, वाटेत त्याच्या वर्गातली मुलें भेटायची आणि मग तो शाळेत आल्यावर ती मुले त्याला चिडवायची.

" आलं का कुक्कुलं बाळ ! बाईचा हात सोडला नाही ना आमच्या छकुल्यानं वाटेत ? नाहीतर मग एखादा वाघ्या भो ऽऽ करून आला असता ना आमच्या सोन्याच्या अंगावर ! नाहीतर एकाद्या ट्रकने पोळी करून टाकली असती आमच्या लडदूची ! "

मग राजूला रडू येई. त्याला वाटे " ममी म्हणजे भारीच हीऽ आहे ! काय होणार आहे मला एकट्याला वाटेत. आणि बिल्डिंगमधली, शेजारची मुलं असतात की सोबतीला. "

राजूने फारच हट्ट केला तेव्हा लीलाताई, शेजारच्या दोनतीन मुलांना राजूवर लक्ष ठेवायला बजावून, राजूला एकट्याला शाळेत पाठवू लागल्या.

राजूला झिपऱ्याच्या झोपडपट्टीवरून जाताना—
पण आता कसली ती झिपऱ्याची झोपडपट्टी !
झिपऱ्या होता कुठे तिथे आता—
राजूला झिपऱ्याची सारखी आठवण यायची—
कुठे बरे असेल झिपऱ्या ?

मधल्या सुट्टीत मुले शाळेसमोरच्या पटांगणात व बाहेर मैदानात खेळत, दंगामस्ती करीत. त्या मुलांचा खेळ पाहायला आजूबाजूची रिकामटेकडी, उनाड मुले जमत. एखादे वेळेस त्यांच्या पायाशी आलेला चेंडू किंवा गोटी घेऊन ते धूम पळत सुटत. मैदानाच्या कडेला बसलेल्या पाटीवाल्या बायांकडून चिंचा, पेरू, बोरे आणि हातगाडीवाल्यांकडून बर्फाचे रंगीत गोळे घ्यायला काही शाळकरी मुले धावत व त्यांच्याभोवती ही आशाळभूत, उनाड पोरं घोळका करीत. काही लाचार पोरं निर्लज्जपणे बोरांसाठी हात पसरीत, तर काहीजण इतर मुलांनी चोखून टाकलेल्या काड्यांना काही चिकटून राहिले आहे का, ते शोधू लागत.

राजू मात्र या विकल्या जाणाऱ्या वस्तूंपासून अगदी दूर राही. त्याच्या ममीने त्याला बजावले होते की, रस्त्यावरले घाणेरडे, धूळ उडालेले पदार्थ कधी खायचे नाहीत. त्याच्या खिशातही कधी पैसे नसत. ममीने दिलेला ‘ डबा ’ खाऊन झाला की, तो खिशातली टॉफी चघळीत कधी चेंडू गोट्या खेळे तर, कधी इतरांच्या खेळाची गंमत पाहत उभा राही.

असाच एक दिवस राजू मैदानात उभा होता. खिशातली एक टॉफी काढून त्याने ती तोंडात टाकली व कागद दूर भिरकावला. एक भिकाऱ्यासारखे दिसणारे पोर कागद उचलताना त्याने पाहिले. ते पोर कागदाकडे जणू प्रेमाने बघत, कागद बोटाने साफसुफ करीत, त्याची घडी करीत, आपल्या खिशात ठेवीत होते. तिकडे पाहता पाहता राजूच्या मनात एकदम काहीतरी हलले.

झिपऱ्या– !

झिपऱ्या अगदी असाच, कागद साफ करून जपून खिशात ठेवायचा–

" झिपऱ्या "– राजूच्या तोंडातून एकदम जोराने हाक निघून गेली.

त्या मुलाने जाता जाता एकदम मागे वळून पाहिले, क्षणभर तो जागेला खिळल्यासारखा झाला आणि मग एकदम ओरडला·

" राजू– ! "

हो, तो झिपऱ्याच होता !

पूर्वीच्या झिपऱ्याचा अवतार काही मोठा दर्शनीय नव्हता, पण आताच्या त्याच्या स्वरूपातील दैन्याने जणू शेवटचे टोक गाठले होते.

आधीच बारकुडचा असलेला झिपऱ्या आता एखाद्या हाडांच्या सापळ्यासारखा दिसत होता. अंगावरच्या कपड्यांच्या चिध्या झाल्या होत्या; पण मळाची पुटे साठलेल्या त्याच्या तोंडावर मूर्तिमंत आनंद प्रगट झाला होता व त्याचे हुबेहूब प्रतिबिंब राजूच्या तोंडावर उमटले होते.

" झिपऱ्या ! " राजू त्याच्याजवळ येत म्हणाला.

" कुठं होतास तू ? कुठं राहतोस आता ? समोर तर कधी दिसतच नाहीस. "

" लई लांब ऱ्हातो मी– " झिपऱ्या चाचरत म्हणाला.

" तुझी झोपडी आहे ? "

" आता कुठली माजो झोपडी ? बाप तर गमावला, माय कवाच ग्येली– कोन बी ऱ्हाय आता माजं. "

झिपऱ्याला रडू येऊ लागले. बाप गेल्यापासून त्याची अशी जिव्हाळ्याने कुणीच चौकशी केली नव्हती. त्यामुळे बाप, झोपडी गमावल्याचे दुःख त्याच्या चिमुकल्या हृदयात जणू साचून राहिले होते. आता जशी काही त्या दुःखाला वाट फुटली होती.

झिपऱ्याला रडताना पाहून राजूला फार वाईट वाटले. तो आणखी जवळ येऊन, झिपऱ्याच्या पाठीवर हात ठेवणार, तोच झिपऱ्या झटकन मागे झाला. डोळे मुठीने कुस्करीत तो म्हणाला,

" म्होरं नको येऊ. तुझी शाफ कापडं खराब व्हत्याल–"

" होऊ देत. " राजू आवेगाने म्हणाला.

" पण मग तू राहतोस कुठं ? मला नेशील तुझं घर पाहायला ?"

" येडा की खुळा तू ? " झिपऱ्या रडता रडता हसला. "माजं घर आहे फुटपाथवर. थतं खुटं येनार तू ? अन् तुझी माय तुला येऊ दिल व्हयं ? "

राजू गोंधळला.

" –अन् मग जेवतोस कुठं तू ? झोपतोस कुठं ? "

" त्ये समदं फुटपाथवर. पन तुला ऱ्हाय समजनार त्येतलं कायबी– पळ, त्यो तुजा साळंतला शिपाई घंटी बडवाया लागला."

" पण–उद्या ये इथंच. खूप बोलायचंय तुझ्याशी, येशील ना? –"

झिपऱ्याने मान डोलावीत त्याला "जा, जा" म्हणून हाताने खूण केली व तो पाठ वळवून जाऊ लागला. राजूने पण घाई-घाईने आपला वर्ग गाठला.

दुसऱ्या दिवशी राजूने झिपऱ्यासाठी म्हणून ममीकडून जास्त टॉफ्या मागून घेतल्या. लीलाताईंना पण झिपऱ्या नजरेस पडल्याचे ऐकून बरे वाटले. त्याची जास्त माहिती काढायला त्यांनी राजूला सांगितले.

पण त्या दिवशी झिपऱ्या राजूच्या शाळेसमोर आलाच नाही. राजू वाट पाहून पाहून दमला. नंतरही कित्येक दिवस झिपऱ्या त्याला भेटायला आला नाही.

कसा येणार ?

कारण 'फुटपाथवर राहतो' वगैरे झिपऱ्याने जे राजूला सांगितले होते, ते खरे नव्हते.

त्याला राजूला खरे सांगायची लाज वाटत होती. आताही झिपऱ्या एका झोपडपट्टीतच राहत होता. झोपडपट्टीचे नाव 'गांधीनगर ! '

पण त्या झोपडपट्टीला 'गांधीनगर' हे नाव देणे म्हणजे एक क्रूर विनोदच होता.

महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान, शिकवण, आचरण आणि या गांधीनगरातील रहिवाश्यांचे जीवन यांत दोन ध्रुवांइतके अंतर होते.

'गांधीनगरात' एका 'दादाची' झोपडी होती. झोपडी पाण्यात वाहून गेल्यावर व दुसऱ्या दिवशी बाप गमावल्याचे समजल्यावर, झिपऱ्या कावराबावरा असा रस्त्यांतून भटकत असताना दादाने पाहिला. दादाच्या सराईत डोळ्यांनी हे सावज आपल्या जाळ्यात अडकण्याजोगे आहे असे ताबडतोब हेरले. झिपऱ्यापाशी गोड शब्दांत दादाने त्याची सारी चौकशी केली. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत तो त्याला 'गांधीनगरात' घेऊन गेला. ती झोपडपट्टी पाहून झिपऱ्याला जरा बरे वाटले. तो पण अशाच एका झोपडपट्टीत वाढला होता ना !

दादाच्या झोपडीत एक म्हातारी बाई होती.

"मावशी–" दादा म्हणाला,

"झाली कां भाकर ? पोर भुकेलं दिसतंय."

म्हातारी समजली. दादाच्या एकंदर 'तंत्राचा' हा भाग तिला छान पाठ होता.

"पोरा," ती मायाळू आवाजात म्हणाली, "भाईर बालडीत पाणी हाय्, हाततोंड विसळ जरा. अन् आतमंदी येऊन धुवट कापडं घाल."

झिपऱ्याने हातपाय धुतले, तोंवर म्हातारीने एक चड्डी व सदरा त्याला होईल असा काढून ठेवला होता. आपले फाटके, मळके कपडे काढून फेकताना झिपऱ्याला फार बरे वाटलें. तोवर म्हातारीने एका अलिमनच्या थाळीत एक जाडशी भाकरी व कसले तरी कालवण वाढले. भुकेल्या झिपऱ्याने ते केंव्हाच अधाशासारखे ओरपून टाकले.

त्याचे जेवण होते न होते तोच झोपडीत एकामागून एक पाच-सहा त्याच्या वयाची व काही त्याच्याहून मोठी अशी पोरे आली. आल्याबरोबर दादा त्यांना घेऊन जरा कोपऱ्यात गेला. पोरांनी दादासमोर, कुणी पैशाचे पाकीट, तर कुणी फाउंटन पेन, तर कुणी घड्याळ अशा वस्तूंचा ढीग केला. दादा ते सारे जमा करीत, कुणाला तोंडाने, तर कुणाला पाठीवर थाप मारून शाबासकी देत होता. मग पोरे भराभरा फळीवरल्या थाळ्या घेऊन म्हातारी-समोर कोंडाळे करून बसली. भाकर-कालवण खाल्ल्यावर ती बाहेर पळाली. त्यांची दंगामस्ती, आरडाओरडा आत ऐकू येत होता.

आता दादाने व म्हातारीने थाळ्या घेतल्या. झिपऱ्या सुन्नपणे सारे बघत होता व जास्त जास्त अस्वस्थ होत चालला होता.

त्याच्या झोपडपट्टीत असा प्रकार त्याने कधी पाहिला नव्हता. दारू, शिवीगाळ, मारामारी, हे त्याला माहीत होते; पण त्या पोरांनी आणलेल्या वस्तू–


ते चोर होते की काय सारे ?

त्याला लहानपणची एक आठवण आली. त्याची माय एका घरी कामाला गेली होती. झिपऱ्या पण बरोबर गेला होता. घरी आल्यावर त्याला चेंडू खेळताना आईने पाहिले. तेव्हा खाल्लेला मार, हातावर दिलेला तापलेल्या उलतन्याचा डाग त्याला अजून आठवत होता. रडून रडून झोपी गेल्यावर आईच्या कुरवाळण्याने तो जागा झाला होता. आईच्या डोळ्यांत पाणी होते. ती झिपऱ्याला म्हणाली,

" लेकरा, आपण गरीब आहोत, पण चोर नाही. कष्ट करतो नि काय भेटेल ते खातो– अर्धपोटी राहतो– तुझा बापूस दारू

खातो, मारामारी करतो; पण चोरी, लांडीलबाडी कंदी ठावी न्हाई त्येला. पुना असं वंगाळ काम करू नग, सोन्या."

आणि तो झिपऱ्या आज चोरांच्या अड्ड्यात येऊन पडला होता. इथून पळून जावे असे त्याला वाटले. तो जागच्याजागी चुळबुळ करू लागला, एकदा उठून झोपडीच्या दारात जाऊन उभा राहिला.



पण दादाने त्याच्या खवाट्याला धरून त्याला फराफरा ओढीत कोपऱ्यात नेले. सकाळचा दादाचा मायाळू चेहरा अन् गोड शब्द

आता पार पालटले होते. डोळे वटारीत, त्याचा कान जोराने पिळीत दादा म्हणाला,

" काय रे पोरा, पळून जायचा इचार हाय की काय तुजा ? " पण याद राख, मुकाटयानं इथं ऱ्हा; ऱ्हाय तर तंगडी मोडून ठिवीन. "

बिचारा झिपऱ्या. सारखा रडत राही. मग दुसरा एखादा पोर म्हणे, " रडतोस कशापाई ? दादा शिकवत्याल त्ये समदं ध्येनात घे. मंग चैन भटकायची, खान्यापिन्याची–"

शिकवण्याचे नाव निघाल्याबरोबर झिपऱ्याने कान टवकारले.

" साळा हाय् दादांची ? "

पोरगा हसून म्हणाला,

" साळाच म्हनायची ! आमी समदं धडं पाठ करूनश्यान धंद्याला लागलो. तूंबी लागशील– "

आणि मग झिपऱ्याचे धडे सुरू झाले. काही त्यातल्यात्यात मोठी पोरे होती ती धडे देत तर, काही किचकट धडे दादा स्वतः देई.

झिपऱ्याला धडे पाठ करायला खूप वेळ लागला; पण मग एक दिवस टोनीबरोबर दादाने त्याला मोहिमेवर पाठवले. सध्या त्याचे काम दुय्यम होते. टोनीने डल्ला मारून चोरलेली वस्तू गुपचूप झिपऱ्याच्या हातात फेकली की, झिपऱ्याने धूम ठोकायची असे. टोनी निष्पाप चेहरा करून उभा राही. त्यातून कधी कोणी पकडला गेलाच व पोलिसांनी रिमांडहोममध्ये पोचवला तर तिथून पळून येण्याचे कसबही दादाने सगळ्यांना पढवून ठेवले होते.

नंतर टोनी त्याला पुढे करू लागला व डोळ्याने खुणावून शिकार साधायला सुचवू लागला; पण झिपऱ्याला कधी कुणाचा खिसा सफाईने कापणे जमत नसे. त्याचा हात थरथर कापे, त्याच्या आईची मूर्ती डोळ्यांपुढे येऊन तो दचके व तेवढ्यात 'सावज' सावध होऊन आपला खिसा संभाळीत निघून जाई.

मग टोनी दादाकडे झिपऱ्याबद्दल तक्रार करी व दादाच्या हातचा खरपूस मार झिपऱ्याला खावा लागे. उपाशीपोटी रडता रडता झिपऱ्याला आपल्या जुन्या झोपडीची, आई-बापांची, तिथल्या संवगड्यांची, राजूची आठवण येई व त्याचा जीव अगदी कासावीस होई.

मग एक दिवस हुशारी करून झिपऱ्याने टोनीला झुकांडी दिली. टोनीने त्याच्याकडे फेकलेले फाऊंटनपेन घेऊन तो पळत सुटला; पण दादाच्या झोपडीकडे न जाता उलट बाजूने पळत तो एका देवळापाशी आला व पेन तिथल्या झुडपात टाकून देऊन देवळाच्या कोपऱ्यात लपला.

बायकापुरुष मारुतीच्या दर्शनाला येत होते. घंटा वाजवून देवापुढे तांदूळ, पैसे, फळे ठेवून जात होते. झिपऱ्या मुकाट्याने सारे पाहत बसला होता. त्याला सारखे रडू येत होते; पण पुढे काय करावे ते समजत नव्हते.

तेवढ्यात दर्शनाला आलेल्या एका पोक्त बाईंचे झिपऱ्याकडे लक्ष गेले. दर्शन घेऊन त्या एका खांबापाशी "देवाचिया द्वारी, उभा क्षणभरी, तेणे मुक्ती चारी, मेळविल्या" म्हणत बसल्या होत्या. झिपऱ्याची रडकी 'सूरत' पाहून त्यांचे मन द्रवले.

" का रे पोरा, का रडतोस ? चुकला–बिकला आहेस की काय ? "

झिपऱ्याला जास्तच रडू कोसळले. माय मेल्यावर त्याला पोटाशी धरून समजावणाऱ्या आपल्या शेजारच्या झोपडीतील ' आज्येची ' त्याला आठवण आली.

" अरे, तुझं घर कुठाय ? आई कुठाय् ? "

झिपऱ्या हुंदके देत म्हणाला,

" कुनीबी न्हाय मला. माय-बाप गमावले, झोपडी पान्यात वाहून गेली. "

बायजाबाई कळवळल्या. त्या पोराला तिथेच सोडून घरी जायला त्यांचे पाऊल उचलेना. मग त्या म्हणाल्या,

" चल माझ्याबरोबर. आमचे शेजारचे काका आहेत ते सांगतील तुला काय करायचे ते. "

घाबरतच झिपऱ्या बायजाबाईंबरोबर निघाला. टोनी कुठे आसपास दिसत नाही ना याचा अंदाज घेत तो कधी दबत–दबत, तर कधी धावपळ करीत पावलामागून पावले टाकीत होता. बायजाबाईंचे घर जवळच होते. घरात शिरल्यावर झिपऱ्याचा जीव खाली पडला.

" काका, अहो काका– " बायजाबाईंनी हाक दिली, तसे काका शेजारच्या खोलीतून बाहेर आले. बायजाबाईंच्या खोलीत डोकावीत ते म्हणाले,

" आं ? हे काय झेंगट आणलंय आज ? –"

बायजाबाई परोपकारी म्हणून चाळीत प्रसिद्ध होत्या. दारचा भिकारी कधी रिकाम्या हाताने त्यांच्यापुढून जात नसे. श्रावणी शनिवारी मुंजा, नवरात्रात कुंवारीण त्यांच्या घरी जेवायला असायची. त्या खोलीत एकट्याच राहत.

मूलबाळ नव्हतेच. यजमान तरुणपणीच गेले; पण घरची इस्टेट खूप होती. बायजाबाईंच्या वतीने कुणी आप्तेष्टांनी खटपट करून भाऊबंदांकडून त्यांना पोटगी मिळवून दिली होती. त्यामुळे बायजाबाईंना काही आर्थिक चिंता नव्हती. दीनदुबळ्यांना, अडल्यापडल्यांना मदत करायचा त्यांचा स्वभावच होता. अशा दानधर्मात त्या पुष्कळ पैसे खर्च करीत. आजचा प्रकार त्यांपैकीच दिसतोय् असा काकांनी तर्क केला.

काकांनी झिपऱ्याला चांगले न्याहाळले. झिपऱ्याला दादाच्या झोपडीत जरी आवडत नव्हते व मधून मधून शिव्या व मार खावा लागत होता तरी त्याचा अवतार आता पूर्वीइतका ओंगळ नव्हता. नेमाने वेळेवर चार बरे घास दादा पोटाला घालीत होता. कपडेही धड असत. स्वतः झिपऱ्यालाही स्वच्छ राहायचे आता कळू लागले होते.

काकांचे मत त्याच्याविषयी बरे झाले. शिवाय, झिपऱ्याच्या तोंडावर परिस्थितीमुळे कारुण्याची एक छटा आली होती. त्यामुळे पाहणाराला त्याच्याबद्दल कळवळा वाटू लागे.

"हं ऽऽ" काका म्हणाले, "आता काय करायचा विचार आहे तुमचा या पोराबद्दल ?"

"तेच तर विचारायला हाक मारली तुम्हाला. पोर गरीब दिसतोय–"

" नाही हो, काही पोरं बनेल दिसतात. तसा नाही हा. पोराचं तोंड सुकलंय्–भूक लागली का रे, पोरा ? नाव काय तुझं ? "

" झिपऱ्या म्हंतात मला. "

" आहेत खऱ्या झिपऱ्या तुझ्या लांबलांब. "

मग बायजाबाईंनी त्याला एका ताटलीत भाकरी-भाजी वाढली.

काकांनी बायजाबाईंना खुणेने खोलीबाहेर बोलावले आणि ते म्हणाले,

" खाऊपिऊ घाला अन् मग जाऊदे कुठं ते–उगीच गळ्यात धोंगडं घेऊ नका. "

काका आपल्याशी हळू बोलत होते; पण खाण्याचे आटपून कान टवकारून पाहत असलेल्या झिपऱ्याला ते ऐकू आले. बायजाबाई दार लोटून घेऊन आत आल्याबरोबर झिपऱ्या तटकन् ताटलीवरून उठला आणि रडत रडत त्याने बायजाबाईंच्या पायाशी लोळण घेतली.

" मावशी, मला घराभाईर घालवू नका. मला मारत्याल–"

" अरे, कोण मारतील ! अन् अन्नावरून असं उठू नये बाबा– चल आधी संपव ते ताटलीतलं. "

झिपऱ्या डोळे पुसून ताटलीपुढे बसला व पाण्याच्या घोटाबरोबर कसेबसे त्याने खाणे संपविले. ताटली उचलून मोरीवर नेऊन त्याने विसळून टाकली.

" पोराला रीत आहे. " बायजाबाई पुटपुटल्या व कापूस-रांगोळी घेऊन फुलवाती करू लागल्या.

झिपऱ्या त्यांच्यासमोर उभा राहून पुन्हा मुसमुसू लागला.

" अरे बाबा, पुरे आता तुझं रडणं. तुला काही आताच घरा-बाहेर काढीत नाहीय् मी. "

नंतर बायजाबाईंनी झिपऱ्याला खोदून खोदून पुष्कळ प्रश्न विचारले. झिपऱ्याला नीट काहीच सांगता आले नाही; पण एकंदरीने बायजाबाईंनी ताडले की, पोर फार भ्यालं आहे.

मग काकांशी खलबत करून बायजाबाईंनी ठरवले की, थोडे दिवस तरी झिपऱ्याला ' चान्स ' देऊन पाहावे.

आणि मग बायजाबाईंच्या घरी झिपऱ्या चांगलाच रुळला. खोली झाडून काढणे, कपबशा विसळणे, वगैरे किरकोळ कामे तो करायला शिकला. शाळेत शिकलेले आठवीत, र ट फ करीत तो बायजाबाईंना मोठ्या अक्षराची पोथी पण वाचून दाखवी.

घराबाहेर जायला मात्र तो राजी नसे. तो कुणाला तरी भितो हे ओळखून बायजाबाईही त्याला बाहेरची कामे सांगत नसत.

पण एक दिवस बायजाबाईंनी अगदी आग्रहच धरला. आता झिपऱ्या स्वच्छ व नेटका दिसे; पण त्याच्या झिपऱ्या बायजा-बाईंना अगदी पाहवत नसत. ' केस कापून ये ' असे त्याला त्या रोज सांगत आणि तो काणा डोळा करी, पण मग बायजाबाईंनी एक दिवस त्याच्या हातात एक रुपया कोंबला आणि " आज झिपऱ्या काढल्या नाहीस तर, आंघोळ नाही नि जेवण पण नाही रे बाबा " असे गमतीने पण दटावून सांगितले.

मग झिपऱ्याचा अगदी नाइलाजच झाला. एका मुठीत रुपया व दुसऱ्या मुठीत आपला जीव घट्ट धरून झिपऱ्या घराबाहेर पडला.

सलून फार दूर नव्हते. भोवताली पाहत पाहत झिपऱ्या झपाटयाने चालत होता. सलून पुढे आल्यावर सुटल्याचा सुस्कारा टाकीत तो सलूनची पायरी चढणार तोच त्याच्या सदऱ्याचा गळा पाठीमागून पकडला गेला.

झिपऱ्याने वळून पाहिले तो दादाच्या टोळीतील बल्या तांबारलेल्या डोळयांनी त्याच्याकडे पाहत होता. मोठयाने ओरडावे असे एकदा झिपऱ्याला वाटले, पण त्याचे केस मुठीत आवळून त्याच्या मानेला हिसका देत बल्या दमलेल्या आवाजाने, पण जरब दाखवीत म्हणाला, ' चूप साल्या, न्हायतर जीव घेईन तुजा. "

झिपऱ्याला ओढीत बाजूच्या गल्लीत बल्याने नेले, तेव्हा झिपऱ्याच्या लक्षात आले की, समोरच बसचा स्टॉप होता. बसचा 'क्यू' म्हणजे सावज गाठण्याची हमखास जागा. घाईगर्दीने लोक बसमध्ये चढू लागले की, अशा खिसेकापूंचे फावायचे. म्हणून बल्या तिथे घोटाळत होता व झिपऱ्याला येताना त्याने दुरूनच पाहिले होते. झिपऱ्याच्या एक थोबाडीत देत बल्या म्हणत होता,

" लेका, पळून गेला व्हतास न्हवं ? समदी टोळी तुला धुंडून थकली. भला आज गावलास ! दादा जळतोय् तुझ्या नावानं रातदिन ! पोलिसात गेला व्हतास ? समदी चहाडी क्येलीस नव्हं ? "

" न्हाय्, न्हाय् " झिपऱ्या कळवळून म्हणाला.

" तुज्या गळ्याशपथ न्हाय. पोलिसात कशापायी जाऊ ? मला माजी मावळण भेटली एक ठाव; तिनं वढून न्येलं घरला. सोड मला, तुज्या पाया पडतो. माजी मायंदळ वाट पाहील ती. "

" बोल खवाटं नाटं, खिसा कापाया जमंना, पण लटकं मस्त बोलाया शिकलास न्हवं ? "

बल्याने त्याचे दोन्ही हात पिरगाळुन त्याला हिसडले तशी झिपऱ्यानें मुठीत घट्ट धरलेला रुपया खळकन् रस्त्यात पडला. बल्याचा चेहेरा रुपया पाहून उजळला.

" आरं त्येच्या " तो रुपया उचलून घेत म्हणाला.

" सोताचा धंदा सुरू क्येलास म्हन ना ! पन योक रुपयाच गावला व्हय ? बाकीचं चा-पावात उडवूनश्यान टाकलंस न्हवं ? बारे गब्रू, चल दादाकडे. पन रुपयाचं दादाकडे बोललास तर मुस्काट फोडून टाकीन चल. "

आता झिपऱ्याचा जीव अगदी उडून गेला. पुन्हा चोरीमारी करायला दादा लावणार, पळाल्याबद्दल मार पडणार या धास्तीनें त्याला रडू कोसळत होतेच; पण रुपया घेऊन आपण पळून गेलो असे काकांना, बायजाबाईंना वाटेल म्हणून त्याला जास्त वाईट वाटत होते. तो गयावया करून बल्लूला म्हणाला,

" बल्या, त्येवढा रुपया मावळणीला परत देऊन मंग येतो तुज्यासंगं. गळ्याशपत, न्हायतर मी चोर हाय असं वाटलं तिला– "

" मंग खवाटं हायं की काय त्ये ? चोरच हाएसन्. चल, खाली पिली वटवट नग करूस. "

शेवटी बलूने झिपऱ्याला ‘गांधी नगरात’ खेचून नेलेच. झिपऱ्याला दादाचा भरपूर मार आणि शिव्या खाव्या लागल्या. दिवसभर उपास पडला.

पण मग या पोराचे काय करावे हा दादाला प्रश्न पडला. एकटा पाठवण्याची सोय नाही. चोरीच्या कामाला उपयोगी पडत नाही. पण दादापाशी दुसरी अनेक कसबे होती. दादा अधूनमधून झोपडीच्या मागे चोरून हातभट्टी लावी व आपल्या ठराविक गिऱ्हाइकांकडे पोरांच्या हाती बाटल्या गुपचूप पोचवी .पण हे काम तर झिपऱ्याला अजिबातच जमेना. बाटल्या हातात आल्या की, त्याच्या नजरेसमोर त्याची आई येई–दारू पिऊन झिंगलेल्या आपल्या बापसाच्या हातचा मार खाणारी, डोक्याला पट्टया बांधून सारखे डोळे गाळणारी– !

मग टोनी दादाकडे तक्रार करी.

“ह्ये रडूबाई नग बा माज्यासंग. हा भिकुरडा लई मागंपुडं करतो. रस्त्यात कुनी सहज हटकलं तरी ततपप करून समदं भांडं फोडूनश्यान टाकतो. अन् बाटल्या धरायला दिल्या तर अशी थराथर लटपटतो आणि कंदी कंदी पिशवी खाली पाडितो पण–

मग दादाने विचार करून ठरवले की, झिपऱ्या फक्त भीक मागण्याच्याच लायकीचा आहे. चेहेरा दीनवाणा अन् भित्रा आहेच. फाटके, मळके कपडे दिले, झिपऱ्यांत जरा धूळ घातली की, मस्त भीक मिळेल.

आणि मग दादाचा दोस्त, दुसरा एक दादा, गांधीनगरमध्ये दादाला भेटायला आला होता. त्याने पुष्कळ भीक मिळण्याची आणखी एक क्लृप्ती सांगितली. तो म्हणाला,

"आरं, अशा घट्टया कट्टयाला कोनबी नाय भीक घालनार– भीक मिलती आंधळ्या–पांगळ्याला."

दादाने म्हातारीशी खलबत केले; रात्री झिपऱ्याच्या डोळ्यांत बिब्ब्याच्या तेलाचे बोट फिरवले की दोन-चार दिवसांत काम होऊन जाईल अशी म्हातारीने खात्री दिली. त्या दोघांमधली ही कुजबुज झिपऱ्याने ऐकली व त्याच्या पोटात गोळाच उठला. म्हातारीने दुसऱ्या दिवशी टोनीला चार आण्याचे बिब्बे आणायला पाठवले. झिपऱ्याने ताबडतोब टमरेल उचलून ओढ्यावर जातो अशी म्हातारीला थाप मारली व झोपडपट्टीपासून जरा दूर गेल्याबरोबर टमरेल झुडपामागे टाकून धूम ठोकली.

घाबरलेल्या झिपऱ्याला आपण कोठल्या बाजूने धावत सुटलो आहो याचे भानच राहिले नाही. बऱ्याच वेळाने तो दम खायला जरा उभा राहिला– आणि पाहतो तो काय–


समोर तेच पूर्वीचे मारुतीचे देऊळ–

आणि बायजाबाई देवळातून बाहेर पडताना त्याला दिसल्या.

क्षणभर काय करावे तेच झिपऱ्याला सुचेना. एकदा त्याला वाटले, बायजाबाईंच्या पाया पडून सारी खरी घडलेली हकीकत त्यांना सांगावी. कदाचित त्या आपल्याला पुन्हा ठेवून घेतील.

असा काही विचार मनात येऊन तो बायजाबाईंच्या बाजूला एकदोन पावले टाकतो तो बायजाबाईंच्याच दृष्टीस तो पडला. तरातरा पुढे येऊन त्यांनी झिपऱ्याचा हात पकडला व त्या कर्कश स्वरात ओरडल्या–

"अरे चोरटचा, भला सापडलास. माझा रुपया घेऊन पळालास काय ? तरी काका मला म्हणत होते, त्याच्यावर विश्वास



टाकू नका म्हणून. पण मी वेडी, सापाला दूध पाजलं आंधळेपणानं– चांगली उपकाराची फेड केलीस पोरटचा."

बिचारा झिपऱ्या आपला बचाव करण्याचा प्रयत्न करीत होता. पण बायजाबाई त्याला पुढे बोलूच देईनात.

" थांब, तुला पोलिसातच देते आता."

बायजाबाई झिपऱ्याला फरफटत रस्त्याने नेऊ लागल्या. झिपऱ्या हुमसून हुमसून रडत होता.

इतक्यात मागून शब्द ऐकू आले.

" काय मावशी, काय प्रकार आहे ? हा मुलगा कोण ?"

ओळखीचा आवाज ऐकू आला म्हणून बायजाबाईंनी मागे वळून पाहिले.

" कोण, चंपूताई का ?" बायजाबाई थांबून म्हणाल्या. " बऱ्या भेटलात. माझं काम करा एवढं, या कारट्याला पोलिसात द्यायचाय्. चोरी केलीन् मेल्यानं माझी, पण मला म्हातारीला काय जमणार चौकीवर जायचं ?"

" असं ?" चंपूताई झिपऱ्याकडे बघत म्हणाल्या. " पण इथं रस्त्यात नको. चला, घरीच जाऊ या तुमच्या. तिथं सांगा मला सगळं."

तिघेजण बायजाबाईंच्या खोलीवर आली. ती पूर्वीची ओळखीची जागा पाहून, तिथे त्याला भेटलेली माया आठवून झिपऱ्याला जास्तच रडू फुटले. बायजाबाईंनी झिपऱ्याला कोपऱ्यात बसवले. दार लावून घेतले व सगळी हकीकत चंपूताईंना ऐकवली. चंपूताई झिपऱ्याकडे पाहत होत्या. झिपऱ्याचे छाती फुटेपर्यंत रडणे, त्याचा हडकुळा देह व सुकलेले तोंड पाहून चंपूताईंना त्याची दया येत

होती. हे पोर इतके बेरड आणि कृतघ्न असेल असे त्यांना वाटेना. मग त्या बायजाबाईंना म्हणाल्या,

"बरं मावशी, मी त्याला जाते घेऊन. मग येऊन सांगते तुम्हाला काय काय झाले ते."

झिपऱ्याला त्याची बाजू सांगण्याची संधी द्यावी असे चंपूताईंना वाटले. त्या झिपऱ्याला घेऊन बाहेर पडल्या.

"संभाळा हं." बायजाबाईंनी बजावले, "नाहीतर देईल तुम्हाला झुकांडी वाटेत."

चंपूताई किंचित हसल्या व झिपऱ्याचा हात घट्ट धरून बाहेर पडल्या.

चंपूताई मराठी शाळेत शिक्षिका होत्या. त्यांचा जन्म अगदी गरीब कुटुंबात झाला होता. पैशाच्या लोभाने त्यांच्या वडिलांनी त्यांना एका म्हाताऱ्याच्या गळ्यांत बांधले होते. दुर्दैवाने तोही चार-पाच वर्षांपलीकडे जगला नाही. सासरी-माहेरी चंपूताईंना काहीच आधार राहिला नाही. मग नवऱ्याने मागे ठेवलेले किडुक-मिडुक मोडून चंपूताईंनी हिंगण्याला शिक्षण घेतले व शाळेत नोकरी धरली. स्वतः त्यांनी गरीबीच्या हालअपेष्टा भोगल्या होत्या. माहेरी गरीबीमुळे होणारे भावंडांचे हालही पाहिले होते. त्यामुळे त्यांना गरीबांबद्दल फार कणव येई. शाळेतले काम संभाळून फावल्या वेळात त्या त्यांच्या घरापासून जवळच असलेल्या अनाथाश्रमात जात व तिथे मुलांना शिकवीत. नाना तऱ्हेची मुले त्यांच्या नजरेखालून गेलेली होती.

त्या दिवशी रविवार होता. त्यांच्या शाळेला सुट्टी होती. व त्या अनाथाश्रमातच निघाल्या होत्या. जाता जाता वाटेत त्यांनी झिपऱ्याशी बोलून त्याच्याकडून त्या रुपयाबद्दलची खरी माहिती काढून घेतली होती. झिपऱ्या बनेल पोरगा नसावा असे त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून त्यांना सारखे वाटत होते. त्यामुळे त्याला एकदम चौकीवर त्यांना नेववेना. अनाथाश्रमात त्याला घेऊन जावे व तिथल्या संचालिकाबाईंचा पण या बाबतीत सल्ला घ्यावा असा विचार करून चंपूताई झिपऱ्याला घेऊन अनाथाश्रमात गेल्या.

अनाथाश्रमात त्या दिवशी जरा गडबड-घांदल चालली होती. शहरातले एक प्रमुख, नावाजलेले महिलामंडळ त्या दिवशी आश्रमाला भेट देणार होते, त्यामुळे साहजिकच जरा जास्त साफ-सुफी चालली होती. आश्रमातले सर्व विभाग मंडळाच्या सभासदांना नीट दाखवण्यासाठी, त्या त्या खोल्यांतून व्यवस्थापिका सज्ज होत्या. मुले नीटनेटके कपडे घालून आपले निरनिराळे उद्योग करीत होती. मुलांच्या हस्तव्यवसायाचे, त्यांच्या वर्गातील कार्यानुभवाचे, गृहपाठाचे निवडक नमुने त्या त्या जागी प्रदर्शित केले होते.

चंपूताई, संचालिका वेणूताई यांच्या ऑफिसात गेल्याबरोबर त्यांना वेणूताई म्हणाल्या,

" बऱ्या वेळेवर आलात, चंपूताई. आज तुमचा वर्ग आहे नाही का ? बरं झालं. बाकीच्या शाळेला आज सुट्टी आहे, पण तुमचा वर्ग पाहता येईल मंडळाला आणि सभासदांना कल्पना येईल आपल्या शिक्षणपद्धतीची. आज भगीरथ कॉलनीतलं महिला उत्कर्ष मंडळ येणार आहे आपला आश्रम पाहायला. "

" हो का ? छान. " चंपूताई झिपऱ्याला जरा पुढे करीत म्हणाल्या. " या मुलाबद्दल तुम्हाला सल्ला विचारायसाठी मी आणला होता त्याला. "

" असं होय ? " झिपऱ्याकडे नजर टाकीत वेणूताई म्हणाल्या.

" पण आता गडबडीत नको. त्याला सांगा, घरी जाऊन दोन-तीन तासांनी ये पुन्हा. "

चंपूताई झिपऱ्याकडे वळून म्हणाल्या.

" ऐकलंस ना ? कुठाय् तुझं घर ? जवळ आहे का इथून ? "

" म्हणजे ? " वेणुताई जरा आश्चर्याने म्हणाल्या.

" तुमच्या माहितीचा नाही हा ? "

" छे हो ! ते सगळं मग सांगते तुम्हाला. बाळा, कुठय तुझं घर ? "

त्यांच्या " बाळा " या हाकेने झिपऱ्याला हुंदकाच फुटला. त्याची माय गेल्यापासून अशी मायेने कुणी हाक मारली नव्हती त्याला.

तो रडू लागला तेव्हा चंपूताई त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणाल्या.

" घरी नाही जायचं तुला ? "

आपल्या हातातून कुणी दांडग्या पोराने रुपया हिसकावून घेतला, यापलीकडे आणखी काही झिपऱ्याकडून त्यांना कळलेच

नव्हते. तेंव्हा त्यांना वाटले, काही मुले आईबाप मारतात या भीतीने घरी जात नाहीत. त्यातला प्रकार झिपऱ्याचा असावा.

पण झिपऱ्या हुंदके देत म्हणाला,

" माजी झोपडी पाण्यात वाहून गेली. बापबी पुरात गमावला. माय आंदीच मरून ग्येली व्हती. "

झिपऱ्याची ती दुर्दशा पाहून दोघींचे मन द्रवले. चंपूताई त्याच्या पाठीवर थोपटीत म्हणाल्या,

" रडू नको. इथं बैस. मी वर्ग घेऊन येते. मग पाहू आपण पुढं काय करायचं ते. "

चंपूताई गेल्यावर वेणूताई जरा सचित मुद्रेने झिपऱ्याकडे पाहू लागल्या. त्याचे ते रडके, झिपरे, गलिच्छ, फाटक्या कपड्यातले ध्यान पाहुण्या मंडळाला तिथे दिसावे हे त्यांना प्रशस्त वाटेना. त्यांनी घंटा दाबून सेविकेला बोलावले.

' बाई, या मुलाला जरा न्हाणीघराकडे नेऊन हात-पाय-तोंड धुवायला लावा आणि मग तुमच्या राहायच्या खोल्या आहेत ना, त्यांच्या पुढल्या पडवीत जरा बसवून ठेवा. जारे बाळा– "

आणि मग त्याच्या सुकलेल्या तोंडाकडे पाहत त्या म्हणाल्या.

" बाई, स्वयंपाकीण काकूंना म्हणावं, सकाळच्या नास्त्यांतलं काही उरलं सुरलं असेल तर द्या त्याला खायला. भुकेला दिसतोय् बापडा. "

खायचे नाव घेतल्यावर झिपऱ्याच्या चेहेऱ्यावर जरा टवटवी आली. त्याच्या पोटात भुकेने कावळे कलकलत होतेच. तो सेविके-

बरोबर गेला व तिने दाखवलेल्या नळावर हात-पाय-तोंड धुवून, ओल्या हाताने त्याने आपल्या झिपऱ्या जरा नीट बसवल्या. बाईंनी आणून दिलेल्या कागदावरचा पाव घेऊन तो पडवीत बसला.

पुष्कळ वेळ पुरवण्यासाठी झिपऱ्या एक एक तुकडा अगदी सावकाश व चवीचवीने चघळीत होता.

थोड्या वेळाने दुरून बायकांची बोलणी ऐकू येऊ लागली; पण वेणूताईंच्या बोलण्यावरून आपण तिकडे कुठें जायचे नाही एवढे झिपऱ्याच्या लक्षात आले होते.

दहाबारा मिनिटांनी एक मुलगा त्याच्या बाजूला धावत येताना त्याने पाहिला. झिपऱ्याकडे त्याचे लक्ष गेले नाही, पण झिपऱ्याने त्याला पाहिले. आणि—

त्याचे डोळे एकदम आनंदाने लकाकू लागले.

हा तर राजू—हो राजूच नक्की—

हाक मारावी " राजू " म्हणून, असे एकदा झिपऱ्याला वाटले—पण तो जरा घुटमळला—

तेवढ्यात

" राजू, ए राजू, हा गेला तरी कुठं बाई एवढ्यात असे म्हणत, एक बाई त्या मुलाच्या पाठोपाठ येताना झिपऱ्याला दिसल्या—

या तर—राजूच्या ममी—

मग झिपऱ्याला राहवेना—तो एकदम उठून उभा राहिला व राजूच्या दिशेने त्याने दोन पावले टाकली. तेवढ्यात राजूची पण

त्याच्याकडे नजर गेली—क्षणभर तो गोंधळला—पण लगेच धावत झिपऱ्याजवळ जात तो आनंदाने ओरडला,

" झिपऱ्या, झिपऱ्या, तू का नाही आलास माझ्या शाळेत पुन्हा ? मी तुझी कित्ती कित्ती वाट पाहिली. "

तोवर लीलाताई पण राजूच्या पाठोपाठ झिपऱ्याजवळ येऊन पोचल्या.

कितीतरी दिवसांनी झिपऱ्या नजरेस पडल्यामुळे त्यांना पण खूप आनंद झाला. त्या विचारू लागल्या,

" झिपऱ्या, कुठे असतोस तू ? या इथं आश्रमात आहेस का? "

पण झिपऱ्याच्या एकंदर अवताराकडे लक्ष गेल्यावर लीलाबाईंनी रास्तच तर्क केला की, झिपऱ्या इथे आश्रमात राहणारा नसणार. कारण आश्रम पाहतांना त्यांनी नुकतीच तिथली स्वच्छ, नीटनेटकी, व्यवस्थित कपडे घातलेली मुले पाहिली होती.

म्हणून त्यांनी पुन्हा विचारले,

" कोणी आणलं तुला इथं ? तुला इथं ठेवणार आहेत का? "

पण झिपऱ्याला तरी कुठे ठाऊक होते, आपण कुणाबरोबर आलो आहोत व पुढे आपले काय होणार आहे ते ?

तो घुटमळला, मग लीलाताईच म्हणाल्या,

" बरं, बैस तू इथं. मी ऑफिसात विचारते तुझ्याबद्दल." लीलाताई राजूचा हात धरून, बाकीच्या बायकांना गाठायला निघाल्या. तेव्हा राजूने आशेने विचारलें,

“मी थांबू इथं झिपऱ्याबरोबर ? ”

लीलाताई जरा घोटाळल्या; पण राजू त्यांच्याबरोबर हिंडून कंटाळला होता. उगीचच नसते प्रश्न मधून मधून विचारीत होता. असाच कुठे तरी मधूनच नाहीसा होत होता. खरे म्हणजे त्याला बरोबर आणण्यात काही अर्थच नव्हता; पण आज रविवारची त्यांच्या सगळ्याच नोकरांनी रजा घेतल्यामुळे व राजूच्या बाबांची ऑफिस ट्रिप असल्यामुळे लीलाताईंना नाईलाजाने राजूला बरोबर आणावे लागले होते. तेव्हा त्या म्हणाल्या.

“ बैस इथं, पण इकडे तिकडे कुठे भटकत राहू नको हं. आश्रम बघून झाला आमचा की, तुम्हा दोघांना बोलवायला येते मी. ”

जाता जाता लीलाताईंनी पर्समधून मूठभर टॉफ्या काढून राजूला दिल्या.

“ झिपऱ्याला पण दे हं.” असे बजावीत त्या लगबगीने बाकीच्या बायकांना शोधायला निघाल्या.

झिपऱ्या डोळे भरून त्या रंगीत चौकोनाकडे बघत होता. आज किती तरी दिवसांनी त्याच्या ओळखीच्या या आवडत्या वस्तू त्याच्या आवडत्या राजूच्या हातात त्याला दिसत होत्या.

राजूने उदारपणे चांगल्या चार टॉफ्या झिपऱ्याला दिल्या व बाकीच्या खिशात ठेवून, एक एक काढीत, सोलून तो तोंडात टाकू लागला. झिपऱ्याने आपले व राजूच्या टॉफ्यांचे रंगीत कागद खिशात ठेवण्याचे काम मोठ्या तत्परतेने चालवले होते. मग गोड चव जिभेवर घोळवीत दोघांच्या गप्पा सुरू झाल्या.

गप्पा सगळ्या राजूच्याच. कारण राजूने किती प्रश्न विचारले तरी झिपऱ्या आपले गतजीवन वर्णन करून त्याला सांगू शकत नव्हता. राजूच्या प्रश्नांना मोघम उत्तरे देत तो वेळ मारून नेत होता.

राजूच्या शाळेतल्या गमतीजमती ऐकताना मात्र तो अगदी तल्लीन होऊन जात होता.

" तू नाही शाळेत जात ? " राजू विचारीत होता.

" मी आता पहिलीत गेलो. तूं कितवीत गेलास ? "

झिपऱ्याच्या डोळ्यात पाणी आले. आता कुठली शाळा ? त्याची पाटी आणि फाटके पुस्तक पाण्यात वाहून गेले ना ! आणि त्यानंतर कधी पाटी-पुस्तक भेटलेच नव्हते.

राजू सहानुभूतीपूर्ण स्वराने म्हणाला,

" कुणी दुसरी पाटी नाही दिली तुला ? मी तुला देईन माझी जुनी जोडपाटी. मला आणखी एक नवी आणलीय्. माझं जुनं पुस्तक पण देईन तुला. चित्रं दाखवीत असे ते —

" किती छान चित्रं व्हती न्हाय ! " झिपऱ्याला जुन्या आठवणींनी गलबलून आले. " अन् ती बेडकाची गोष्ट ? "

" आठवते ना तुला ? आताच्या माझ्या पुस्तकात शेपूट तुटलेल्या उंदराची गोष्ट आहे. "

" शेपूट तुटलेला उंदीर ? कुनी तोडली त्येची शेंपटी ? "

झिपऱ्याला वाटले, कोण करते हे सगळे उपद्व्याप ? कुणाची शेपटी तुटते तर, कुणाचे मायबाप गमावतात !

पण राजू त्याला उंदराच्या शेपटीची गोष्ट सांगत होता. झिपऱ्याचे त्या गोष्टीकडे तितकेसे लक्ष नाही असे पाहून तो म्हणाला,

" याच्याहून छान आहे दुसरी–ससा अन् कासव यांच्या शर्यतीची. तो धडा आमचा झाला नाही अजून वर्गात. पण ममींनी मला सांगितली ती गोष्ट. "

झिपऱ्या ऐकत होता. त्याच्या मनात येत होते–पांढरा, गोजिरवाणा ससा– या राजूसारखा छान, छान असणार, अन् कासव– काळे, घाणेरडे, अडाणी– आपल्यासारखे– ते काय सशाबरोबर धावणार ?

पण राजू सांगत होता,

" शेवटी काय गंमत झाली–"

पण शेवटच्या गंमतीपर्यंत पोचण्याच्या आधीच ऑफीसची बाई आली.

" ह्या बाबान्‌ला हपिसात पाहुण्याबाईसाहेब बलावत्यात– अन् तुला पन रे पोरा– 'बाबासंग बसलाय् त्या पोरास्नी बलाव' असं बाईसाब म्हनल्या अन् मंग आमच्या सायबास्नी पण याद आली– तुला हतं बशिवलाय् म्हून. "

बाई राजूचा हात धरून निघाल्या. झिपऱ्या दबकत दबकत मागून चालू लागला.

वेणूताई सगळ्या महिलांना पोचवीत, पोचवीत प्रवेशद्वारापर्यंत गेल्या होत्या. सर्वांचे आभार मानून, आश्रमाच्या कामाबद्दल

झो....४

असाच जिव्हाळा ठेवण्याची विनंती करून वेणूताई ऑफिसात आल्या, तेव्हा लीलाताईही त्यांच्याबरोबर परत फिरल्या.

" आमचा राजू त्या तिकडे बसलाय्, त्याला घेऊन येते."

" एकटाच बसलाय् ?" वेणूताई म्हणाल्या.

" नाही. त्याला ओळखीचा एक मुलगा भेटला तिथे, त्या तुमच्या सेविकांच्या खोल्यांसमोर–"

" अगबाई, विसरलेच." वेणूताई एकदम म्हणाल्या. " चंपूताईंच्या बरोबर आलेल्या मुलाला बसवला होता मी तिकडे. तुम्ही बसा लीलाताई ऑफिसात. मी पाठवते बाईला दोघांना आणायला– "

आणि मग वर सांगितल्याप्रमाणे बाई दोन्ही मुलांना ऑफिसमध्ये घेऊन आली. तितक्यात चंपूताईही वर्ग संपवून ऑफिसात आल्या.

मग राजूला आणि झिपऱ्याला जरा बाहेरच बसायला सांगून वेणूताईंनी चंपूताईंना झिपऱ्याची माहिती विचारायला सुरुवात केली. चंपूताईंनी आपल्याला बायजाबाईंकडून कळली होती ती व झिपऱ्याने त्यांना सांगितली होती तेवढी माहिती वेणूताईंना दिली.

मग लीलाताई म्हणाल्या,

" अहो, मला पण माहीत आहे हा मुलगा. आमच्या समोरच्या झोपडपट्टीत राहत होता. त्याची आई आमच्याकडे कामाला यायची. तेव्हा तिच्याबरोबर हा झिपऱ्या पण यायचा, राजूची त्याची गट्टी होती. मग झिपऱ्याला मी म्युनिसिपालिटीच्या शिशु-

वर्गात पण घेतला होता; पण पुढे त्याची आई वारली, पुरात बाप वाहून गेला, अन् नंतर मात्र त्याचं काय झालं हे मला माहीत नाही."

"म्हणजे? तेव्हा मुलाची एकंदर चालचलणूक ठीक होती म्हणता?" वेणूताईंनी विचारले.

"हो. तशी सगळी झोपडपट्टीच वागणुकीत वाईट नव्हती. आता अस्वच्छता, दारू, मारामारी, शिव्यागाळी– सगळ्या झोपडपट्टीत असतात तशा तिथे होत्याच; पण चोरी-मारी, रस्त्याने जाणारांची छेड काढणं, सुरा दाखवणं– असे प्रकार कधी होत नव्हते तिथे." लीलाताई सांगत होत्या.

"मला पण वाटतं चेहऱ्यामोहोऱ्यावरून की मुलगा वाईट नसावा. आता मधे, झोपडी सुटल्यावर, काही दिवस वाईट संगतीत सापडला असावा बहुतेक– पण बायजाबाईंच्या घरी चांगला ओळीला लागला होता. पुन्हा वाईट लोकांच्या तावडीत सापडला. पण तिथून पळून आला– त्यावरून वाटतं, त्याचा ओढा वाईट प्रवृत्तीकडे नाही." चंपूताई म्हणाल्या.

वेणूताई विचार करीत होत्या.

"काय करावं म्हणता मग? रिमांडहोममध्ये पाठवावा का?"

"पण मला वाटतं–" लीलाताई म्हणाल्या, "तिथून पुन्हा त्याचे जुने दोस्त त्याला पळवून नेतील व वाईट मार्गाला लावतील. अशा गोष्टी आपण ऐकतो नेहमी. शिवाय, रिमांडहोममध्ये गुन्हेगार वृत्तीची मुलं असतात. ती घालतील एखादे वेळेस याला भरीला अन् याला घेऊन पळतील. तसा पोर लहान आहे–स्वभावाने गरीब–जरा भाबडाच आहे."

" मला पण तीच भीती वाटते. " चंपूताई म्हणाल्या, " त्यापेक्षा इथे आश्रमात ठेवून घ्यावा त्याला. इथलं वातावरण सुरक्षित आहे, चांगल्या संस्कारांचं आहे. इथं राहिला तर पोराचं कल्याण होईल. "


" तेही खरंच म्हणा, " वेणूताई विचार करीत म्हणाल्या, " शिवाय तुम्ही, चंपूताई, दर सुट्टीच्या दिवशी इथं येता, तेव्हा तुमचीही नजर राहील त्याच्यावर. आणि लीलाताई, तुम्ही पण याल का मधूनमधून ! तुमची पूर्वीची ओळख आहे त्याच्याशी. तुमच्या वरच्यावर भेटण्याचा चांगला परिणाम होईल त्याच्यावर. "

" अवश्य ! " लीलाताई तत्परतेने म्हणाल्या. " झिपऱ्यासाठी तर येईनच मी, पण वेणूताई, इतरही माझ्याकडून होईल असं, आश्रमातलं काहीतरी काम द्या मला. अहो, तुम्ही सगळी या बिचाऱ्या अनाथ मुलांसाठी इतकं झिजतां, सारं आयुष्य त्यांच्या-साठी खर्ची घालता. तेव्हा आमच्यासारख्यांनी थोडं तरी काही करणं, आमचं कर्तव्य आहे असं मला वाटतं. "

" फार, फार आभारी होऊ आम्ही तुमच्या, लीलाताई. " वेणू-ताई मनःपूर्वक म्हणाल्या, " तुमच्यासारख्या स्त्रिया जर असं आश्रमाच्या कामात लक्ष घालतील, तर या पोरांचा किती फायदा होईल म्हणून सांगू ? तुम्ही मुलांना आपल्या सणांच्या, व्रतांच्या गोष्टी सांगू शकाल, नवे कल्पक खेळ शिकवू शकाल, मुलींना शिवणकाम, विणकाम यांचे धडे देऊ शकाल— अहो, एकदा करायलाच लागलं म्हणजे सुचायला लागतं एकेक. "

" खरं आहे तुमचं म्हणणं. आमच्या मंडळातल्या इतर बायकांना पण सांगेन मी तुमची कल्पना. आज सगळा आश्रम आणि इथलं बहुमोल कार्य बघितल्यावर, त्यांच्या मनावर पण झाला असेलच की परिणाम माझ्याप्रमाणेच ! "

" मी सुद्धा करते माझ्या हातून होईल ते. चंपूताई म्हणाल्या.



" पण मग या झिपऱ्याचं काय करायचं ठरवलं तुम्ही ? " वेणूताई हसत म्हणाल्या,

" आधी त्याचं बारसं करू आणि मग त्याचं जावळ काढू, झिपऱ्याऐवजी एखादं दुसरं चांगलंसं नाव सुचवा."

लीलाताई जरासा विचार करून म्हणाल्या.

" कृष्णासारखी त्रिस्थळी झाली त्याची. एकीकडे जन्मला, दुसरीकडे वाढला आणि मग तिसरीकडे राज्य स्थापलं. तसाच हा– याला किशा म्हणत जाऊ या. "

नाव पसंत झाले व मुलांना आत बोलावण्यात आले. लीलाताई पहिल्यापासून ओळखीच्या म्हणून ' किशाला, ' सगळे समजावून सांगणे वेणूताईंनी लीलाताईंवर सोपविले.

लीलाताई किशाला जवळ घेऊन म्हणाल्या.

' झिपऱ्या, तुझं नाव आजपासून आम्ही 'किशा' ठेवलंय्. आता या झिपऱ्या काढून टाकायच्या आणि या वेणू मावशीच्या जवळ राहायचं. यांच्या शाळेत छान चांगलं शिकायचं. शिकशील ना?"

झिपऱ्याने मान डोलावली. तो बावरला होता पण आपल्याला रस्त्यावर सोडणार नाहीत, शिवाय शाळेत पाठवतील हे समजल्यावर त्याचा चेहरा चांगलाच उमलून आला.

पण जेव्हा लीलाताई राजुला घेऊन जायला निघाल्या तेव्हा त्याचा चेहेरा गोरामोरा झाला व डोळ्यांत पाणी गोळा होऊ लागले. मग लीलाताई त्याला जवळ घेत म्हणाल्या.

" शहाण्यासारखं आनंदात राहायचं इथं. मी येईन तुला भेटायला मधून मधून. "

" आणि राजू ? " किशा डोळ्यातील पाणी प्रयत्नानें परतवीत उत्सुकतेने म्हणाला–

" त्याला पण आणीन ना. " लीलाताईंनी आश्वासन दिले, राजूने त्याला खिशातली आणखी एक टॉफी दिली. सर्वजण गेल्यावर वेणूताईंनी किशाला हाती धरून ऑफिसमध्ये आणलें.

किशाला रीतसर अनाथाश्रमात दाखल करून घेण्यासाठी,— पोलिसात खबर देणे, जुवेनाईल कोर्टासमोर केस ठेवणे वगैरे कराव्या लागणाऱ्या सर्व गोष्टी वेणूताईंनी क्रमशः केल्या. अशा सर्व गोष्टी करण्याची त्यांना नेहेमीची सवय होतीच.

अर्थात किशाला आश्रमात रुळेपर्यंत पुष्कळ जड गेले. प्रथम "काय ग बया" करीत आश्रमातल्या कामवाल्यांनी त्याची घासपूस केली, त्याला तोंड द्यावे लागले. त्याच्या झिपऱ्या उडाल्या, फोडांना, फुटलेल्या ढोपरा-कोपरांना मलमपट्टया झाल्या व वेळेवर खाऊ-पिऊ घातले गेल्यामुळे त्याचे गाल जरा वर आले.

पण राजूशी एकदम जमली तशी गट्टी आश्रमातील मुलांशी जमण्यास वेळ लागला. राजूशी तो मनमोकळेपणी पहिल्यापासूनच बोलत असे; पण आता वय वाढल्यामुळे त्याच्या मनात संकोच उत्पन्न होई. आपल्या बोलण्याची मुले टिंगल करतील अशी त्याला भीती वाटे. दैनंदिन कार्यक्रमातही त्याच्या हातून चुका होत व इतर मुले त्याला उघडपणे हसली नाहीत तरी, त्याचे त्यालाच फार ओशाळल्यासारखे होई.

सकाळी उठून सर्व मुलें तोंडे धुऊन, प्रार्थना करून जेवणघरात येत. आपली ताटली, भांडे फळयांवरून काढून घेऊन नास्ता करीत व भांडी विसळून लाकडी चौक्यांवर पालथी घालीत. पण किशाला यातली प्रत्येक गोष्ट नवी व अपरिचित होती. झोपडपट्टीत असताना माय "त्वांड धू" म्हणून ओरडत असे. पण नंतर झिपऱ्याने नीट तोंड धुतले की, तो तसाच भाकरतुकडा हातात घेऊन झोपडीबाहेर पळाला, याच्यावर कोणाचे लक्ष होते? प्रार्थना,

व्यवस्थित भांडी विसळून जाग्यावर ठेवणे वगैरे गोष्टी तर त्याला माहीतच नव्हत्या. काय थोडे दिवस बाईजाबाईंच्या खोलीत पाहिल्या होत्या तेवढ्याच– पण त्याही आठवणीतून पुसून गेल्या होत्या.

राखुंडी किंवा दातवण घेऊन दात घासायचे हे इतर मुलांचे पाहून तो शिकला; पण प्रारंभी त्याची खूप तारांबळ व्हायची. राखुंडी पोटात जायची, तोंड धुतलं तरी राखुंडीचे काळे ओघळ तोंडावर तसेच राहायचे. मग एखादा मुलगा हसला, काळतोंड्या माकड म्हणून चिडवायला लागला की, किशाला रडायला येई; पण तरीही काय झाले ते त्याच्या लक्षात यायचेच नाही. मग नास्ता वाटणाऱ्या बाई इतर मुलांना दटावीत, किशाला म्हणायच्या,

" किशा, त्वांड नीट धुऊन र्‍यान ये पुन्हा. "

तोंडाबरोबर डोळ्यांतील पाणी नीट धुऊन किशा यायचा पण मग, आतापर्यंत असा नेमाने, नीटनेटका कधीही पुढे न आलेला घाससुद्धा, त्याच्या घशाखाली उतरायचा नाही.

प्रार्थनेचे शब्द तर नीट तोंडी बसायला त्याला खूपच दिवस लागले. मुले प्रार्थना म्हणू लागली की, तो त्यांच्याकडे टकमका बघत राही. त्याच्याहून कितीतरी लहान असलेली मुलेसुद्धा धडाधड संस्कृत श्लोक म्हणताना पाहून त्याला स्वतःची फार लाज वाटे व तो रडवेला होई. मग प्रार्थना संपल्यावर बाई त्याला एकीकडे घेऊन सांगत,

" किशा, हे बघ या पुस्तकात आपण म्हणतो ते चार श्लोक आहेत, ते कागदावर नीट लिहून घे आणि पाठ कर. तुझं लिहून झालं की, पुस्तक मला परत दे. "

लहानपणापासूनच पुस्तक ही गोष्ट किशाला फार प्रिय होती. राजूची रंगीत चित्रे असलेली पुस्तके तर तो अगदी पोटाशीच धरायचा. या पुस्तकातली पांढऱ्याशुभ्र कागदावरची, बकुळीच्या फुलासारखी टपोरी संस्कृत अक्षरे त्याला फार आवडली. –पण ती तशीच्या तशीच लिहून घेण्याइतके लिहिता कुठे येत होते किशाला? पूर येण्यापूर्वी तो शिशुवर्गात बसे खरा, पण

" रामा गाईला चारा घाल; मग धार काढ. " या पलीकडे त्याचे ज्ञान गेले नव्हते. नंतर बायजाबाईंकडे–

" उडदामाजी काळेगोरे । काय निवडावे निवडणारे ॥"

इतपत तो र ट फ करीत वाची; पण नंतर त्याला पुस्तकाचे दर्शन घडलेच नव्हते. त्यामुळे ही संस्कृत, एकमेकांशी लगट करणारी जोडाक्षरे म्हणजे त्याला एक न सुटणारे कोडेच होते. कुणा दुसऱ्या मुलाला विचारावे तरी पंचाईतच. एक तर त्याला आपल्या अडाणीपणाची लाज वाटे– अन् मुले टिंगल करतील ही भीती.

पण मग रविवारी चंपूताई आल्या तेव्हा पूर्वीच्या ओळखीचे कुणीतरी भेटल्यासारखा आनंद तर त्याला झालाच; पण आता आपली ही श्लोकाची अडचण त्या दूर करतील म्हणून त्याला अगदी हायसे झाले.

पण पहिल्यांदा मात्र चंपूताईंनी,

“काय किशा, कसं काय चाललंय तुझं?” असे प्रेमाने विचारून त्याच्या पाठीवरून हात फिरवला, तेव्हा त्याच्या डोळ्यांतून पाणी येऊ लागले.

शेजारी दोन-तीन मुले उभी होती, ती म्हणाली.

“बाई, रडूबाईच आहे हा. सारखा सारखा रडतो. कुक्कुलंबाळच की नाही. आम्ही नाही बुवा कधी असे रडत. पडलो, खरचटलं, रगत आलं—तरीही नाही आम्ही रडत.”

पडला, खूप लागलं तर किशासुद्धा कधी रडत नव्हता. झोपडपट्टीत दादाच्या हातचा इतका मार खाल्ला होता. आता एवढ्या तेवढ्या खरचटण्याने काय रडू येणार?

पण कुणी मायेने पाठीवरून हात फिरवला म्हणजेच किशाला रडू कोसळे.

काय गंमत आहे, नाही? लहान मुलांना कुणी मारले—रागावले तर रडू येते नेहमी. पण किशाला मात्र कुणी मायेने बोलले, कुरवाळले तर रडू येई. कारण माय गेल्यापासून प्रेमाचा शब्द किंवा मायेचा स्पर्श याचा अनुभवच नव्हता त्याला. त्यामुळे कुणी मायेने बोलू लागले की, त्याचे डोळे पाझरू लागत.

मग चंपूताईंनी त्याला जरा एकीकडे घेऊन खोदून विचारले.

“का, वाईट वाटतं तुला? इथं तुला कोणी वाईट...”

पण चंपूताईंना ठाऊक होते की आश्रमातली सगळीच माणसे फार मायाळू होती. वेणूताईंची शिस्तच तशी होती. त्यामुळे किशाला आश्रमात वाईट वागणूक मिळणे शक्यच नव्हते. आता मुले चिडवीत असतील. मुलेच ती—

किशानेही जरा वेळाने कबूल केले की, मुले त्याची टिंग करतात–

" पण तेवढ्यासाठी न्हाय बरं का मी रडत ! "

दादाच्या 'गांधीनगर' मधील मुले झिपऱ्याला थोडे का छळी होती व त्याच्या नवशिकेपणाची थोडी का टिंगल करीत होती

डोळे पुसून काढून किशाने खिशातल्या फडक्याने नाक सा केले.

चंपूताईंना कौतुक वाटले. किशा किती सुधारला होता आता तो सदऱ्याच्या बाहीला नाक घाशीत नव्हता.

त्या हसल्या तसा किशाही हसला.

" मज्जा वाटती इथं मावशी " किशा उल्हासून सांगू लागल " अक्षी शाप कापडं घालायला, मस्त भाकर-तुकडा, अन् रातच हतरायला धड सतरंजी नि पांघराया घोंगडी– मस्त ऊब येत पघा. "

चंपूताईंचे डोळे ओलावले. साध्यासुध्या जीवनावश्यक गोष्टीं त्याला इतके कौतुक वाटत होते ! यावरून झिपऱ्या असता त्याचे खाण्यापिण्याचे, अंथरूण-पांघरूणाचे किती हाल झाले अस तील त्याची कल्पना येत होती.

" पन मावशी–" किशा बोलत होता, " हा येवडा काग वाचाया शिकवा मस्नी– आन् मंग दोदिशी तोंडपाठ म्हनूनश्या घ्या. "

" किशा " त्याच्या हातातून कागद घेत चंपूताई म्हणाल्या, ' कागद म्हणायचं. ' दाखवा, मला मग, म्हणून ' असं शुद्ध बोलायचं. "

" हां, हां " किशा ओशाळून म्हणाला, " लई—आपलं पुष्कळ ध्येनामंदी—आपलं—ध्यानात धरतो पण " मिस्टेक " होते मधून-मधून. "

चंपूताई हसल्या त्याच्या "मिस्टेकला;" पण किशाच्या सुधारण्याच्या प्रयत्नांचे व उत्कंठेचे त्यांना कौतुक वाटले.

मग वर्ग संपल्यावर ऑफिसजवळच्या खोलीत येण्याबद्दल त्याला सांगून त्या आपल्या वर्गावर गेल्या.

खोलीत दोघे बसली व चंपूताईंनी किशाकडून कागदावरील—

"गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वरः। "वगैरे श्लोक पुन्हा पुन्हा म्हणून घेतले. किशाने मन लावून ते दोन—चार दिवस पाठ केले व चंपूताई पुन्हा आल्या तेव्हा ते त्यांना घडाघडा म्हणून दाखवले. चंपूताईंची किशाला शाबासकी देतादेता पुरेवाट झाली.

पण वर्गात मुलांबरोबर अभ्यासात राहायला त्याला फार जड जाई. सबंध वर्गात त्याच्या एकटयाकडेच जास्त लक्ष देणे शिक्षकांना शक्य नव्हते. मग एक दिवस शिक्षकाने त्याला खालच्या वर्गात नेऊन बसवले. तिथली मुले अगदीच छोटी होती. त्यांच्याबरोबर बसून शिकायला किशाला भारी लाज वाटे व डोळे पाण्याने भरत.

चंपूताई रविवारी आल्या म्हणजे त्याला मदत करीत; पण ती पुरी पडत नसे. मग एक दिवस वेणूताई जेव्हा त्यांना किशाच्या

शिक्षणातील प्रगतीबद्दल विचारू लागल्या तेव्हा चंपूताई, जरा विचार करून म्हणाल्या.

" वेणूताई, एक सुचवू का ? किशाला वर्गाबरोबर अभ्यास ठेवायला जड जाते व लहान मुलांबरोबर बसायला लाज वाटते. व्यक्तिशः त्याच्याकडे लक्ष पुरवायला हवे आहे. तेव्हा मी म्हणते, त्याला माझ्या घरी ठेवून घेऊन मी माझ्या शाळेतच नेला तर त्याच्यावर माझे लक्ष राहील सारखे व घरीही त्याला मी जास्त वेळ शिकवू शकेन. "

चंपूताईंचा किशावर दिवसेदिवस जास्तच जीव जडत चालला आहे याची कल्पना वेणूताईंना आली होती. साहजिकच होते ते. चंपूताईंचे आपले असे जगात कुणीच नव्हते. स्त्रीच्या हृदयात वात्सल्याचा अखंड झरा वाहत असतो. ज्याचे जगात कुणी नाही असे किशासारखे अनाथ मूल भेटल्यावर चंपूताईंच्या हृदयातील वात्सल्याला बाहेर पडायला वाट मिळाली.

वेणूताई विचार करीत म्हणाल्या.

" चंपूताई, तुम्ही किशाच्या भल्यासाठी इतक्या झटता, मला कौतुक वाटतं तुमचं. त्या पोराचंही नशीब चांगलं दिसतंय्. त्याला तुमच्या घरी ठेवण्यासाठी नियमाप्रमाणे काय व्यवस्था करायची ती सगळी मी करीनच; पण चंपूताई, ही जबाबदारी घेण्यापूर्वी तुम्ही नीट विचार करा. ही आर्थिक जोखीम उचलण्यापूर्वी ती आपल्याला कितपत झेपेल याची शहानिशा करा. आता किशा तसा जाणता आहे, त्याच्यापाशी बोलून बघा. "

मग एक दिवस चंपूताईंनी किशापाशी हा विषय काढला.

"किशा, तू माझ्याघरी राहायला येतोस का काही दिवस? म्हणजे तुझ्या अभ्यासाकडे मला जास्त वेळ देता येईल. मग तू माझ्याबरोबर माझ्याच शाळेत शिकायला येत जा."

किशाला चंपूमावशी आपल्याला जास्त शिकवू शकतील या विचाराने खूपच आनंद झाला. सध्या त्याचे सारे चित्त अभ्यासावरच केंद्रित झाले होते.

तो उल्हासून म्हणाला,

"हो मावशी, मला आवडेल तुमच्या घरी. आता इथल्या मुलांची, बाईंची आठवण येईल खरी– पण तुमच्यासारखा दर रविवारी मी पण येईनच की त्यांना भेटायला."

वेणूताईंनी रीतसर सगळी व्यवस्था केली आणि किशा चंपूताईंच्या घरी राहायला आला. किशाच्या पालकत्वाबद्दल आश्रमाच्या व जुवेनाईल कोर्टांच्या ज्या काही अटी होत्या त्या सगळ्या चंपूताईंनी आनंदाने मान्य केल्या.

आता किशा चंपूताईंच्या घरचा झाला. चंपूताईंना काही तसा फार पगार नव्हता. प्राथमिक शाळेतल्या शिक्षिकेला कितीसा पगार असणार? पण किशा राहायला आल्यावर त्यांनी एक-दोन शिकवण्या धरल्या. किशाची जबाबदारी त्यांनी स्वखुषीने घेतली होती. तेव्हा काटकसरीने राहून आपल्या घासातला घास त्याला देऊन, त्याच्या शिक्षणाचे तारू ठिकाणावर नेऊन पोचवण्याची त्यांना महत्त्वाकांक्षा व हौसही होती.

आता किशाच्या अभ्यासाने चांगलाच जोर धरला. तो चंपूताईंच्याच शाळेत दाखल झाल्यामुळे चंपूताईंचे त्याच्या प्रगतीवर सतत लक्ष राहू लागले.

दिवसामागून दिवस चालले होते. किशा दरवर्षी वरच्या वर्गात चढत चढत प्राथमिक शिक्षण पूर्ण करून हायस्कूलमध्ये दाखल झाला. आता तो शाळेत एकटा जाऊ लागला. दादाची पोरे पकडून नेतील ही भीती आता त्याला वाटत नव्हती. एक तर दादाच्या टोळीतली पहिली मुले जाऊन आता दुसरी आली होती. शिवाय कुणी जुन्या ओळखीच्या मुलाने हटकलेच तर, आता किशाला त्याच्याशी दोन हात करायची हिंमत आली होती. ती मुलेही आता किशा ' जंटलमन ' झाला असे मनाशी म्हणत चार पावले दूरच राहू लागली.

हायस्कूलमध्ये शिक्षणाचा खर्च अर्थातच वाढला; पण लीलाताईंनी खर्चाची समस्या बऱ्याच प्रमाणात सोडवली. त्या आश्रमात कबूल केल्याप्रमाणे वरचेवर जात होत्या. किशाची एकंदर सुधारणा व त्याची शिक्षणातील प्रगती पाहून त्यांना फार आनंद वाटत वाटत होता. चंपूताईंच्या घरी किशा राहायला गेल्यावरसुद्धा त्या उभयतांना सणावाराचे दिवशी आपल्या घरी बोलावीत. राजूची व किशाची गट्टी तर दिवसेंदिवस वाढतच होती. एक दिवस किशा येऊन गेल्यावर राजू लीलाताईंना म्हणाला,

" मम्मी, आता झिपऱ्या ' लई न्हाय ' म्हणत नाही. " मग त्याचे जुने झोपडपट्टी छाप शब्द आठवून आठवून दोघे खूप हसली. मग लीलाताईंनी राजूला बजावले,

" राजू, आता त्याला झिपऱ्या नाही हं म्हणायचं. "

राजूने मान डोलावली, पण त्याच्या घरासमोरच्या झोपडपट्टीतला झिपऱ्या, त्याचे रूप, पोशाख व त्याचा भाबडेपणा राजूच्या मनात अजूनही घर करून होता.

लीलाताईंच्या महिलामंडळाने गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा उपक्रम नुकताच सुरू केला होता. लीलाताईंनी शिफारस करून त्यांपैकी एक शिष्यवृत्ती किशाला मिळवून दिली.

किशाही हळूहळू मोठा होत होता व त्याला परिस्थितीची जाणीव होऊ लागली होती. त्याच्या चिमुकल्या डोक्यात काय काय बेत चालले होते ! तो एक दिवस चंपूताईंना म्हणाला,

" मावशी, तुम्ही आता इतक्या शिकवण्या करू नका. तुम्हांला भारी दगदग होते. "

किशाचे ते शब्द ऐकून चंपूताईंना धन्य धन्य झाले. आपल्याबद्दल काळजी करणारा, एकतरी जिव्हाळ्याचा जीव आहे हे पाहून त्यांना कितीतरी समाधान वाटले! अर्थात परमेश्वराने त्यांना दिलेले, त्यांच्या स्वतःच्या सत्कृत्याचेच हे फळ होते नाही का ? अनाथ किशाला त्यांनी 'आपला' म्हटले, स्वतः झीज सोसून, कष्ट करून त्याला मार्गाला लावण्याचे जे उपकाराचे काम केले त्याचे फळ त्यांना किशाच्या कृतज्ञ प्रेमाने मिळत होते.

मग चंपूताईंच्या परवानगीने किशाने निरनिराळी छोटी कामे करून पैसे मिळविण्याची खटपट सुरू केली.

एक दिवस राजूच्या दारावरची घंटा उजाडते न उजाडते तोच वाजली. दूधवाला असेल म्हणून लीलाताईंनी दार उघडले तो किशा वर्तमानपत्रे हातात घेऊन उभा.



लीलाताई आश्चर्यचकित झाल्या.

"कोण, किशा! – तूं इकडे कुठे ? आत येना."

" उगीच मिनिट–दोन मिनिट येतो. कारण पेपर टाकायला उशीर झाला तर, लोक ओरडतील ना." किशा आत शिरत म्हणाला.

" शाब्बास, किशा. आपल्या पायावर उभे राहायला शिकतोस ना– शाब्बास तुझी."

" तुमची सर्वांची सहानुभूती आहे म्हणून शक्य होईलसं वाटतंय, आणखी पण अशीच काही कामं मिळाली तर बघतोय मी."

" मी पण लक्ष ठेवीन हं, तुझ्याजोगं काम काही आढळलं तर! पण किशा, शाळा न् अभ्यास मुख्य हं–बाकीचं सारं काही नंतर–"

" अर्थात्च मावशी बरं जातो. राजूला नका उठवू. मी येईन रविवारी त्याला भेटायला."

मग लीलाताईंनी खटपट करून दूध केंद्रावरून बाटल्या आणण्याचे बऱ्याच घरांचे काम किशाला मिळवून दिले. तसेच आपल्या महिला मंडळाचे, सर्क्युलरे फिरवायचे व मासिकांच्या फिरत्या लायब्ररीचेही काम त्याला देवविले.

महिना संपल्यावर मिळवलेले सगळे पैसे किशाने चंपूमावशीजवळ आणून दिले, तेव्हा चंपूताईंना गहिवरून आले. त्याला पोटाशी धरीत त्या म्हणाल्या,

" बाळा, किती गुणी आहेस रे! कशी सोन्यासारखी बुद्धी देवानं दिली आहे तुला. झोपडपट्टीत ही बुद्धी कुजून गेली असती रे बाबा. देवानं खैर केली अन् वाचवलं तुला."

मग किशा हसून म्हणाला,

" देवाने नाही काही– देवीनं मावशी. त्या दिवशी त्या आजींनी सांगितल्याप्रमाणे जर तुम्ही मला चौकीवर नेलं असतं–, "

" अरे लबाडा, " चंपूमावशी किशाचे नाक चिमटीत धरीत म्हणाल्या,"बराच बोलायला शिकला आहेस की आणि जरी चौकी-वर नेला असता तरी,काही बिघडलं नसतं बरं· पोलिसांनी रिमांड-होममध्ये पाठवला असता आणि तिथेही तू असाच शिकला असतास. "

" हो. पण मग ही मावशी कशी मिळाली असती मला?" किशा चंपूताईंच्या मांडीवर डोके घुसळीत म्हणाला.

आणखी जरा मोठा झाल्यावर किशा संध्याकाळी कुठे एखाद्या दुकानात हिशेब लिहायचा तर, कुठे एखाद्या डॉक्टरची बिले वसूल करण्याचा, तर कुठे एखाद्या दवाखान्यात पेशंट्स्ची उठबस पूसतपास करण्याचा- रिसेप्शनिस्टचा-असा उद्योग शोधून काढू लागला. तो एक एक इयत्ता वर चढू लागला, तसतशी त्याच्या शिष्यवृत्तीची रक्कमही लीलाताई महिलामंडळाकडून वाढवून देऊ लागल्या.

होता होता किशा दहावीच्या एस्. एस्. सी. च्या परीक्षेला बसला. रिझल्ट लागायला खूपच अवकाश होता. मध्यंतरीच्या काळात कितीतरी कामे करून तो पैसे मिळवीत होता. पुढच्या शिक्षणाबद्दल त्याच्या डोक्यात विचार चालू होते.

राजूही त्याच परीक्षेला बसला होता. तोही कुठे टाईपिंग क्लास तर, कुठे फोटोग्राफीचा क्लास यामध्ये मध्यंतरीच्या वेळाचा उपयोग करीत होता. आता रोजची शाळा नसल्यामुळे दोघांना एकमेकांना भेटायला पुष्कळ वेळ मिळे.

अशाच एका दुपारी किशा राजूच्या घरी गप्पा मारायला आला होता. लीलाताईही त्यांच्या गप्पांत मधूनमधून भाग घेत होत्या. चालू फॅशनप्रमाणे राजूने लांब केस वाढवले होते. आता उन्हाळ्यात ते कापून जरा कमी करण्याबद्दल लीलाताई किती दिवस त्याच्यामागे लागल्या होत्या, पण राजूची टंगळमंगळ चालली होती. मग लीलाताई गमतीने म्हणाल्या,

" बाकी झिपऱ्याचा दोस्त म्हणून तू आताशा चांगलाच शोभून दिसतोस हो. आता नाही, पण लहानपणी किशाच्या अशाच झिपऱ्या होत्या. "

दोघे मित्र खो खो हसू लागले व लीलाताई चहा ठेवायला स्वयंपाकघरात गेल्या. मोरीत भांडी घाशीत बसलेली चिंगी आपल्याशीच खुदुखुदू हसताना पाहून त्या जरा दटावल्यासारखे म्हणाल्या,

" काय ग चिंगे, भांडी घासताना अशी स्वतःशीच वेड्यासारखी खिदळते काय आहेस ? "

चिंगी प्रयत्नाने हसू दाबीत म्हणाली.

" बाई, तुमी झिपऱ्या, झिपऱ्या असं काय बाय् बोलत व्हताना बाहिर, ते ऐकूनश्यान मस्नी न्हानपनची याद आली. तवा व्हता एक झिपऱ्या आमच्या झोपडपट्टीत. लई खोड्या काडायचा माझ्या. वयेस वढायचा. पन मस्ती कराया मजा पण लई यायची. "

" ए बये. " लीलाताई लटक्या रागाने म्हणाल्या,

" आता सहावीच्या परीक्षेला बसायचीस पुढल्या वर्षी आणि अजून ' लई, क्येस ' म्हणतेस काय ? नापास व्हायचं आहे का परीक्षेत ? "

चिंगी जीभ चावीत म्हणाली,

" वर्गात नाय् काय असं बोलत मी. समद्याच मुली शुद्ध बोलतात तसंच मीबी बोलते; पण झोपडपट्टीत सारा दीस कानावर पडतंना, तसं येतं त्वांडात पघा. "

" बरं, बरं. " लीलाताई म्हणाल्या,

" पण आता ही सवय अगदी सोडून दे. घरीदारी नेहमी शुद्ध बोलायचं, तो झिपऱ्या बघ कसा सुधारलाय्. कधी चुकूनसुद्धा अशुद्ध भाषा तोंडात येत नाही त्याच्या आता. "

" कोन ? आमचा झिपऱ्या ? अन् तो कवां भेटला बाई तुम्हाला ? असतो तरी खुटं तो ?–त्येचा तर पत्याच न्हाय आम्हाला. लई–आपलं–पुष्कळ दिवस ! "

" हो, हो, बरं–तुमचाच झिपऱ्या ! कुठं असतो म्हणशील तर, तो बघ बाहेर हॉलमध्ये बसला आहे ! "

चिंगी आश्चर्याने उठून उभीच राहिली आणि तशाच राखेच्या हातांनी हॉलच्या दाराशी जाऊन तिने हॉलमध्ये डोकावून बघितले.

मग आत येऊन नाक मुरडून ती म्हणाली,

" आज मस्करी मांडलीय् जनू माजी, बाईंनी. "

" आता काय सांगावं ! अग, तो झिपऱ्याच आहे, तुमच्या झोपडपट्टीतला; पण आता बघ किती सुधारलाय्. अग, तू नाही का पूर्वीपेक्षा किती बदललीस ? "

लीलाताईंना दहा-अकरा वर्षांपूर्वीची चिंगी आठवली. तेव्हा असेल पाच सहा वर्षांची. झिपऱ्याच्या आईनंतर लीलाताईंनी चिंगीच्या आईलाच कामावर ठेवली होती. तेव्हा चिंगी आईबरोबर यायची. काही दिवसांनी लीलाताईंनी तिच्या आईचे मन वळवून तिला आपल्या महिलामंडळाच्या शिशुवर्गात पाठवायला सांगितले. मजल दर मजल गाठीत चिंगी आता सहावीत आली होती. पुढे मग आईच्या ऐवजी कधीकधी तीच लीलाताईंच्या घरचे काम करायला यायची. लहानपणची फाटक्या झग्यातली, पालथ्या मुठीने नाक चोळणारी चिंगी आता छापील पातळ नेसू लागली होती व दोन वेण्यांना रंगीत रिबिनी लावायला शिकली होती. हे सगळे आठवल्यावर त्या चिंगीला म्हणाल्या,

" चल बरं बाहेर जरा,-बघू झिपऱ्या तुला ओळखतो कां? "

चिंगीने हात धुतले. पातळ, केस नीटनेटके केले. झोपडपट्टीतल्या मुलांमुलीप्रमाणे ती चांगलीच धिटुकली होती. नागरी संकोच तिला अजून शिवला नव्हता.

दारात उभी राहून ती मोठ्याने म्हणाली,

" काय झिपऱ्या, वळख लागती का न्हाई ? " अन् तोंडाला पदर लावून ती खुदूखुदू हसू लागली.

किशा डोळे विस्फारून तिच्याकडे पाहतच राहिला. कोण ही ? आपल्याला जुन्या नावाने हाक मारणारी, जुनी ओळखीची बोली

बोलणारी, जुनी ओळख सांगणारी ? त्याने आपली लहानपणची झोपडपट्टी डोळ्यापुढे आणली. आपला रोजचा दिनक्रम तो आठवू लागला. सकाळी उठून तोंड धुवायच्या निमित्ताने, भोवतालच्या पोरांवर पाणी उडवायचे. मग एकमेकाच्या मागे धावायचे. आया अंगावर ओरडेपर्यंत दंगामस्ती करायची—कोणकोण होती बरे पोरे ती ? हां—पद्या, झिग्या, बाजल्या—हो, आणि पोरी पण होत्या—चिमी, धोंडी, फेंगडी—आणि सगळ्यांच्या मागे शेपटासारखी घुटमळणारी, सारखी पायामध्ये अडमडून शिव्या खाणारी एक चिमुरडी, वेंधळी—चिंधी—

अरे हो, चिंधी !

मग ही चिंधी की काय ?

" तू—तू चिंधी तर नव्हेस ? " तो अडखळत म्हणाला,

" पण, छे! ते कसं शक्य आहे ? "

" कां रे बाबा, नाही शक्य ? " राजू किशाच्या पाठीवर थाप मारीत म्हणाला,

" झिपऱ्याचा किशा होतो, एस. एस. सी. ला बसतो, मग तुझी पहिली चिंधी चिगी होऊन सहावीच्या परीक्षेला का बसू नये ?"

किशाने मान डोलावली—

" पण चिंधीची चिगी झाली, सहावीत गेली तरी अजून ' वळख लागती कां न्हाई ?' असंच बोलतीय.

" तें तुम्हाला पूर्वीची आठवण यावी म्हणून. " चिगी धीटपणे म्हणाली,

" नाही तर मला पण तुमच्यासारखं बोलता येत बरं का किशाभाऊ ! "

" नाही ग. " किशा जरा हळवा होऊन म्हणाला.

" मघाच्यासारखंच बोल. लई ग्वाड लागतं बघ कानाला. " किशाची ती झिपऱ्याची आठवण देणारी बोली ऐकून सगळ्यांनाच हसायला येऊ लागले.

" खरंच किशा," लीलाताई म्हणाल्या. "आमची शहरी भाषा भारी रुक्ष–कोरडीकोरडी वाटते. ही खेडवळ बोली मलासुद्धा कधी कधी फार मधुर व आपुलकीची वाटते. "

मग लीलाताईंनी चिंगीची सगळी हकीकत किशाला सांगितली. लीलाताईंनी चिंगीला शिक्षण देण्यात पुढाकार घेतल्याचे ऐकून किशा हसत म्हणाला,

" म्हणजे मावशी, चंपूमावशीने जसं मला दत्तक घेतलं, तसं तुम्ही या चिंधीला दत्तकच घेतलंत म्हणाना ! "

" जवळजवळ तसंच. " लीलाताई म्हणाल्या,

" एक प्रकारे घरातलीच झाली आहे ती. शिवाय किशा, आमच्या महिलामंडळाने ही समोरची सारी झोपडपट्टीच दत्तक घेतलीय् म्हणेनास ?"

एवढ्यात चिंगी काम आटोपून, दाराशी येऊन बसली होती. ती म्हणाली,

" किशाभाऊ, पहिल्यापेक्षा झोपडपट्टी आता फार सुधारलीय् बरं. बाईचं महिलामंडळ, तसंच कामगार कल्याण केंद्र पण कितीतरी करून राहिलंय, आमच्या ' जवाहर नगर ' साठी. "

लीलाताई स्पष्टीकरण करीत म्हणाल्या,

" आमच्या महिला मंडळानेच इथल्या जवळच्या ' कामगार कल्याण केंद्राच्या ' शाखेच्या माणसांना मुद्दाम बोलावून आणून, इथली सगळी परिस्थिती दाखवली. या दोन वर्षांत शाखेने कितीतरी होतकरू मुलांना हाताशी धरून, कुणाला शाळेत, तर कुणाला काही धंद्यात गुंतवून दिलंय्. "

" त्यामुळं आता झोपडपट्टीत रिकामटेकड्या, उडाणटप्पू मुलांची दंगामस्ती खूप कमी झालीय्." चिंगी पोक्तपणे म्हणाली. व तिने किशाकडे साभिप्राय नजरेने बघितले. तेव्हा किशाला मोह झाला की, लहानपणी आपण तिचे केस ओढीत होतो, तशा तिच्या वेण्या खट्याळपणे पुन्हा ओढाव्यात.

" किशा, " लीलाताई म्हणाल्या, " तू एकदा तिथे जाऊन बघच. आता झोपडपट्टीत स्वच्छता पण खूप झालीय्. माझ्या ओळखीच्या एक सोशल वर्कर बाई ' जवाहर नगरला ' वरचेवर भेटी देतात. आरोग्याचे नियम, स्वच्छतेची आवश्यकता वगैरे गोष्टी त्या सर्वांना समजावून सांगतात. कधी मॅजिकलँटर्नच्या साहाय्याने माहितीपर छोटे अनुबोधपट दाखवण्याची व्यवस्था करतात. आमच्या महिलामंडळातर्फे आम्ही तिथे एक फिरते क्लिनिक चालवतो. एक डॉक्टरीणबाई आठवड्यातून एकदा तिथे

येऊन खरूज, डोळे येणे, ताप–सर्दी–खोकला वगैरे किरकोळ तक्रारींवर औषधोपचार करतात.”

“शिवाय, लायनस् क्लबच्या लोकांनी गेल्या हिवाळ्यात गरम कपडे, घोंगड्या वगैरे वाटले होते ,नाही ग ममी?” राजू म्हणाला.

ही सगळी हकीकत ऐकून किशाला असे झाले की, केव्हा एकदा ती पूर्वपरिचित झोपडपट्टी डोळे भरून आपण पाहू? तिथे पुष्कळ हाल झाले असले तरी, बाळपणच्या आठवणी तिच्याशी निगडीत असल्यामुळे त्याला ती प्रियच वाटत होती.

“चलतेस का चिंगे? आताच येतो मी तिकडे.” किशा उत्कंठेने म्हणाला.

“अरे, चल. मी पण येते.” लीलाताई म्हणाल्या. “आमच्या क्लिनिकचा वार आहे आज.”

मग लीलाताई, चिंगी व किशा जवाहरनगरमध्ये गेली.

त्या झोपड्यांतून फिरताना किशाला पूर्वीचे सारे– आपली झोपडी, माय, बाप–सारे आठवून त्याचे अंतःकरण भरून येत होते. पूर्वीचे ओळखीचे चेहेरे मधूनमधून दिसत होते. आपल्या दारातल्या मडक्यातले पाणी सांडून टाकून पळालेल्या झिपऱ्याला शिव्या घालणाऱ्या गिर्जाबाय; फेंगडीला पाडून रडवले म्हणून बखोटे धरून धपाटे घालणाऱ्या रुक्याबाय; माय गेल्यावर, झिपऱ्याला पोटाशी धरून समजावणाऱ्या सारजाबाय्; बापाने मारल्यावर त्याला सोडवून घेऊन, आपल्या झोपडीत नेऊन त्याच्या हातावर गुळाचा खडा ठेवणाऱ्या बयाज्जी– किशाला दिसत होत्या.

अर्थात् त्याला कुणीच ओळखले नाही. पण चिगी खारीसारखी इकडून तिकडे सुळकन फिरत सगळ्यांच्या कानात कुजबुजत होती व मग सगळ्या अचंब्याने तोंडावर पदर धरीत.

"खरं म्हनतीस ? हा झिपऱ्या ? बायमाजी" असे उद्गार काढून त्याच्याकडे कौतुकाने बघत होत्या. बयाज्जीनें तर त्याच्यावरून ओवाळून टाकल्यासारखे करीत आपल्या कानशिलांवर बोटे दुमडली. किशाही "लागतीया का वळख ?" असे कुणाला म्हणत, तर कुणा वडिलांच्या पायांना स्पर्श करीत, तर कुणा मुलांच्या पाठीवर ओळख पटल्याची थाप देत साऱ्या झोपड्यांतून फिरत होता. तिथली स्वच्छता, सुधारणा पाहून त्याला फार बरे वाटत होते.आपण पण यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे असे विचार त्याच्या मनात गर्दी करीत होते.

पण आता परीक्षेचा निकाल लागण्याचा दिवस जवळ जवळ येत चालला. किशाला जरा हुरहुर वाटू लागली. तसे त्याचे पेपर बरें गेले होते; पण इतर अनेक उद्योग संभाळून केलेल्या अभ्यासाच्या जोरावर यश कितपत मिळते, याची त्याला धाकधूक वाटत होती.

अखेरीस एकदाचा एस्. एस् सी. चा रिझल्ट लागला. राजूला ऐंशी टक्के गुण मिळाले आणि किशाला पण साठ टक्के गुण मिळाले.

आता चंपूताईंना किशाला कुठे ठेवू नि कुठे नाही असे होऊन गेले. पुष्कळसे पेढे बरोबर घेऊन किशासह त्या आश्रमात गेल्या. किशाने वेणूताईंच्या पायांना हात लावून नमस्कार

केला. वेणूताईंचे डोळे भरून आले; प्रेमाने त्यांनी त्याला आशीर्वाद दिला.

मग किशा आश्रमभर फिरून सगळ्यांना पेढे देत सुटला. सगळ्यांनाच किशा घरच्यासारखा वाटत होता. त्यामुळे सर्वांचीच तोंडे आनंदाने फुलली व पेढ्यांनी गोड झाली.

ऑफिसमध्ये वेणूताई चंपूताईंना म्हणत होत्या, " चंपूताई, तुमच्यामुळे हे वाया जाऊ पाहणारं पोर हाती लागलं आणि एवढं पुढं गेलं. याचं सगळं श्रेय तुम्हाला आहे. "

चंपूताई गहिवरून म्हणाल्या,

" परमेश्वराची कृपा ! किशा तसा मूळचाच सत्प्रवृत्त होता, शिक्षणाला आसुसलेला होता, फक्त कुणी बोट धरून योग्य मार्गा-वर त्याला पोचवायला पाहिजे होतं. "

इतक्यात लीलाताईंही राजूच्या परीक्षेचे पेढे घेऊन आल्या. साहजिकच मुलांच्या पुढच्या अभ्यासक्रमाबद्दल चर्चा सुरू झाली.

" राजूचं काय ठरलं?–डॉक्टर होणार की इंजिनिअर? "

" त्याला इंजिनिअर होण्याचीच महत्त्वाकांक्षा आहे. तो आय्. आय्. टी. साठी प्रयत्न करणार आहे. " लीलाताई म्हणाल्या.

" अवश्य. " वेणूताई म्हणाल्या. " किशाचं काय ठरलंय् चंपूताई ?"

" मी त्याला इंजिनिअर नाही तर डॉक्टर होईपर्यंत शिकव-णार, असं नक्की ठरवलंय्. " चंपूताई म्हणाल्या. वेणूताईंनी व लीलाताईंनी एकमेकींकडे बघितले. मग वेणूताई म्हणाल्या,

" चंपूताई, किशाला मार्क बरे पडलेत. त्याच्याच शाळेत सायन्स कोर्सला त्याला अकरावीला प्रवेश मिळेलही– त्याच्या शाळेने गेल्या वर्षीच ज्युनिअर कॉलेजचे वर्ग उघडलेत–पण– "

" हो, तिथेच घालणार आहे मी त्याला–मग पुढे कुठला कोर्स घ्यायचा ते ठरवू आपण. " चंपूताई ठामपणे म्हणाल्या.

" ऐकून घ्या चंपूताई, " लीलाताई म्हणाल्या. " तुम्हाला त्याला खूप खूप शिकवण्याची हौस आहे, त्यालाही उमेद आहे– सगळं खरं–; पण परिस्थितीचाही विचार केला पाहिजे–नुसत्या खर्चाचं नाही म्हणत मी. पैशासाठी तुम्ही काय, किंवा आम्ही काय, आपल्या म्हटलेल्या किशाचं शिक्षण अडू देणार नाही पण,"

" मग पण काय आणखी ?" चंपूताई उतावीळपणे म्हणाल्या.

" मी सांगते–" वेणूताई म्हणाल्या. आम्ही दोघींनी किशाच्या पुढच्या शिक्षणाबद्दल पुष्कळदा आपापसात चर्चा केली आहे. हे पाहा, लहानपणी वर्षे फुकट गेल्यामुळे किशा इतर दहावीच्या मुलांपेक्षा वयाने मोठा आहे. लीलाताईंच्या हिशोबाप्रमाणे त्याला एकुणीसावे-विसावे वर्ष असेल. यापुढे सहासात वर्षांचे कोर्स त्याला देणे कितपत श्रेयस्कर आहे ? शिवाय, या कोर्समध्ये वर्षे फुकट जाण्याचीही भीती असते. हुशार, हुशार मुलेसुद्धा एक दोन वेळा गोते खातात; अन् तेही फक्त अभ्यास एके अभ्यास करीत असूनही. आपला किशा अभ्यासाव्यतिरिक्त किती उद्योग करतो पाहिलेच आपण. गेली दोन-तीन वर्षे– आणि ते बरोबरच आहे म्हणा. स्वाभिमानी मुलाला शक्य तितके स्वावलंबी होण्याची इच्छा असतेच. तेव्हा या लांबच्या कोर्सपेक्षा एखादाशॉर्ट कोर्स जर

किशाला घेता आला तर, त्याचे शिक्षण लवकर पूर्ण होऊन तो संपूर्णपणे आपल्या पायावर उभा राहील. "

हे बोलणे चालू असतानाच किशा आपले पेढे वाटण्याचे काम आटोपून ऑफिसमध्ये येऊन बसला होता. वेणूताईंचे बोलणे संपल्यावर तो म्हणाला,

" मावशी, मी एखादा शॉर्ट कोर्स घ्यावा असं तुम्ही एकदा मला सुचवलं होतंत, त्याबद्दल मी आमच्या शिक्षकांचा सल्ला घेतला. त्यांचेही मत पडले की, मी टेक्निकल स्कूलमध्ये इलेक्ट्रिक वायरमन किंवा मेकॅनिकल ड्राफ्टस्मन असा दोन–तीन वर्षांचा कोर्स करावा.त्याप्रमाणे मी आता प्रवेशासाठी अर्ज करणार आहे."

शॉर्ट कोर्सबद्दल तिघांचे एकमत झालेले पाहून चंपूताई जरा हिरमुष्ट्या झाल्या, पण लीलाताईंनी त्यांची पुन्हा समजूत घातली तेव्हा त्यांनीही किशाला शॉर्ट कोर्स करण्यास संमती दिली.

योग्य वेळी किशाला टेक्निकल स्कूलमध्ये प्रवेश मिळून त्याचा अभ्यासक्रम सुरळित सुरू झाला. पूर्वीप्रमाणेच शिष्यवृत्ती व त्याच्या इतर उद्योगांपासून होणारी प्राप्ती यांच्या आधारावर त्याची प्रगती होत गेली.

मधून मधून राजू व किशा भेटत व आपल्या भावी जीवनाबद्दल बेत करीत. राजू इंजिनिअर होऊन मोठाल्या इमारतींची कंत्राटे घेणार होता. किशा त्याचा विश्वासू व कुशल ड्राफ्टस्मन होणार होता.

चिंगी ही लीलाताईंच्या घरी दोघांना मधून मधून भेटे, तेव्हा आदर्श शिक्षिका होण्याचा आपला निश्चय बोलून दाखवी. ती सहावी पास होऊन आता प्राथमिक शाळाशिक्षकांच्या ट्रेनिंगचा कोर्स करीत होती.

समोरच्या झोपडपट्टीतील लोकांसाठी त्यांना परवडतील अशी छोटी, पक्की घरे बांधण्याच्या योजना राजू व किशा आखीत होते. चिंगी तिथल्या मुलांसाठी नमुनेदार शाळा उघडणार होती.

□ □ □

BVBK-0401488